## देशातील पहिली सहकारी टॅक्सीसेवा होणार सुरू



**नवी दिल्ली :** देशातील पहिली सहकारी टॅक्सीसेवा डिसेंबरमध्ये सुरू होत आहे. तिचे नाव भारत टॅक्सी आहे. नोव्हेंबरमध्ये दिल्लीमध्ये ६५० चालकांसह पायलट प्रकल्प सुरू होईल. त्यानंतर पुढील महिन्यात ती इतर राज्यांमध्ये विस्तारेल. तोपर्यंत पाच हजार चालक आणि महिला सारथी या सेवेत दाखल होतील. सध्या, ओला आणि उबरसारख्या खासगी कंपन्या टॅक्सीसेवा देत आहेत, पण सुरक्षेच्या समस्या अनेकदा उपस्थित केल्या गेल्या आहेत. म्हणूनच केंद्र सरकार स्वतःची, देखरेख केलेली टॅक्सीसेवा सुरू करत आहे. भारत टॅक्सी हे सहकार मंत्रालय आणि राष्ट्रीय ई-शासन विभागाने विकसित केलेले पहिले राष्ट्रीय सहकारी राइड-हेलिंग प्लॅटफॉर्म आहे. चालकदेखील यात सह-मालक असतील. या उद्देशाने अलीकडेच सहकार टॅक्सी को. ऑपरेटिव्ह लिमिटेडसोबत एक सामंजस्य करार करण्यात आला आहे.


रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १८ ◆ अंक ९७

www.ramprahar.com

# राम प्रहर

शनिवार, २५ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


खालापूरमध्ये वादळी पावसात झोपडी पडली/२

कपडे, दिवाळी फराळासह जातीच्या दाखल्यांचे वाटप/६

आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी तायक्वांदोपटूंची निवड/८


# आता मच्छीमारांनाही वीज सवलत

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील मच्छीमारांसाठी राज्य सरकारकडून दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. आता शेतकऱ्यांप्रमाणे मच्छीमारांनाही वीज सवलत मिळणार आहे. राज्याचे मस्त्य व्यवसायमंत्री नितेश राणे यांनी केलेल्या मागणीनंतर राज्य सरकारकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे आता वीज सवलतीच्या प्रवर्गात राज्यातील मच्छीमारही येणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाचा मच्छीमारांना मोठा फायदा होणार आहे.



(संग्रहित छायाचित्र)

मस्त्य व्यवसायाला कृषीचा दर्जा देण्यात आल्याने शेतकऱ्यांना ज्या प्रकारे वीज सवलत दिली जात होती; त्याप्रमाणेच आता मच्छीमारांनाही वीज सवलत मिळणार आहे. यामध्ये मच्छीमार, मस्त्य संवर्धक, मस्त्य व्यावसायिक, मस्त्यकास्तकार यांना विजेमध्ये शेतकऱ्यांसारखीच सवलत मिळणार आहे. या सवलतीचा लाभ घेण्याचा मस्त्य व्यवसाय प्रकल्पाची एनएफडीबी अंतर्गत नोंदणी असणे बंधनकारक असणार आहे. मच्छीमारांसाठी राज्य सरकारकडून विजेचे दराबाबत पत्रकच काढण्यात आले आहे.

### आधीचे वीजदर

लघुदाब वर्गवारीमध्ये १५० रुपये महिना, वहन आकार १.४७, वीज आकार ५.८४ रुपये; उच्चदाब वर्गवारीत ११५ रुपये महिना, वहन आकार ०.७४, वीज आकार ८.३२; अतिउच्चदाब वर्गवारीत ११५ रुपये महिना, वहन आकार लागू नसून वीज आकार ८.३२ रुपये होता.

### आताचे वीजदर

लघुदाब वर्गवारीत ६० रुपये महिना, वहन आकार १.४७, वीज आकार ३.३२ रुपये; उच्चदाब वर्गवारीत ११५ रुपये महिना, वहन आकार ०.७४, वीज आकार ५.९७; अतिउच्चदाब ११५ रुपये महिना, वहन आकार लागू नसेल, तर वीज आकार ५.९७ असणार आहे.

# अत्याचारग्रस्त महिला डॉक्टरची आत्महत्या

**फलटण : प्रतिनिधी**

साताऱ्याच्या फलटण शहरातील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या महिला डॉक्टरने एका हॉटेलमध्ये आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. मृत डॉक्टरने आत्महत्येपूर्वी तिच्या तळहातावर सुसाइड नोट लिहिली असून त्यात तिने पोलीस उपनिरीक्षकासह दोन जणांवर बलात्कार आणि मानसिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत.



संपदा मुंडे असे या डॉक्टर महिलेचे नाव असून तिने सुसाइड नोटमध्ये म्हटले आहे की, पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने यांनी तिच्यावर चार वेळा बलात्कार केला, तर पोलीस अधिकारी प्रशांत बनकर यांनी तिचा सलग चार महिने मानसिक छळ केला. या प्रकरणी फलटण शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४(२) (एन) आणि १०८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपींना पकडण्यासाठी बीड आणि पुणे येथे दोन शोधपथके रवाना करण्यात आली आहेत.

### निलंबनासह कठोर कारवाईचे आदेश

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची तत्काळ दखल घेत साताऱ्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्याशी संपर्क साधून आरोपी पोलिसाला निलंबित करण्याचे तसेच या प्रकरणाचा सखोल तपास करून दोन्ही आरोपींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने याचे तातडीने निलंबन करण्यात आले आहे.

## बसला लागलेल्या भीषण आगीत २० प्रवाशांचा मृत्यू

**कुर्नूल : वृत्तसंस्था**

आंध्र प्रदेशच्या कुर्नूलमध्ये शुक्रवारी (दि. २४) पहाटे भरधाव एका खासगी बसला भीषण आग लागून २० प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत काही जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या महितीनुसार कावेरी ट्रॅव्हल्सची ही बस हैदराबादहून बंगळुरूला जात होती. कुर्नूल जिल्ह्यात चिन्ना टेक्कुर गावाजवळ या बसने एका दुचाकीला धडक दिली. या अपघातानंतर मोठा स्फोट झाला आणि बसला आग लागली. ही आग इतकी भीषण होती की काही मिनिटांतच संपूर्ण बसला आगीने वेढा घातला. या आगीत किमान २० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या बसमधून ४० प्रवासी प्रवास करत होते. बसला आग लागल्यानंतर काही प्रवाशांनी खिडकीच्या काचा फोडून बाहेर उड्या मारल्या. त्यामुळे त्यांचे प्राण वाचले. जखमी झालेल्या प्रवाशांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## युवावर्गाच्या स्वप्नांची रोजगार मेळाव्यातून पूर्तता

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन | ५१ हजार उमेदवारांना नियुक्तीपत्रांचे वाटप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाच्या युवावर्गाची स्वप्ने रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून पूर्ण होत आहेत, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १७व्या रोजगार मेळाव्याला व्हिडीओ संदेशाच्या माध्यमातून संबोधित करताना म्हटले आहे. रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून आतापर्यंत ११ लाख नियुक्त्या करण्यात आल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.



पंतप्रधान मोदींच्या हस्ते नियुक्तीपत्र वितरणाचा कार्यक्रम शुक्रवारी (दि. २४) रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून देशभरात झाला. या रोजगार मेळाव्यात वेगवेगळ्या सरकारी खात्यांमध्ये पद मिळालेल्या ५१ हजार उमेदवारांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. या वेळी पंतप्रधानांनी विकसित भारत योजनेची घोषणा केली तसेच साडेतीन कोटी युवकांना रोजगार देण्याचे उद्दिष्ट या योजनेतून साध्य करण्याचे आहे, असे सांगितले.


दरम्यान, या मेळ्याचा भाग म्हणून मुंबईत झालेल्या कार्यक्रमात राज्याचे मंत्री आशिष शेलार आणि महाराष्ट्र गोवा सर्कलचे पोस्ट मास्टर जनरल अमिताभ सिंह यांच्या हस्ते ८० उमेदवारांना नियुक्तीपत्र दिली गेली, तर नागपुरात झालेल्या रोजगार मेळाव्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी उमेदवारांना नियुक्तीपत्रे देण्यात आली.

## इस्लामपूर नव्हे; आता ईश्वरपूर!

**मुंबई :** महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर शहराचे नाव आता ईश्वरपूर असे करण्यात आले आहे. केंद्र सरकारने या नामांतराला मान्यता दिली असून भारतीय सर्वेक्षण विभागाकडून मंजुरीपत्र प्राप्त झाले आहे.

राज्य सरकारने इस्लामपूरचे नामकरण ईश्वरपूर केले होते. या नामकरणाला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. आता ईश्वरपूर असे इस्लापूरचे अधिकृत नाव असणार आहे. शहरवासीयांच्या दीर्घकाळाच्या इच्छेचा आदर करून हे पाऊल उचलण्यात आल्याचे सरकारचे म्हणणे आहे,

## जाहिरात क्षेत्रातील दिग्गज पियुष पांडे यांचे निधन



**मुंबई : प्रतिनिधी**

आधुनिक भारतीय जाहिरात क्षेत्राचे शिल्पकार पियुष पांडे यांचे शुक्रवारी (दि. २४) सकाळी मुंबईत निधन झाले. गेले काही दिवस ते विषाणू संसर्गाने आजारी होते. ७०व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

'अबकी बार मोदी सरकार' तसेच पोलिओ लस अभियानाच्या 'दो बूंद जिंदगी के' जाहिरातींचे ते जनक होते. कॅडबरी डेरी मिल्क, एशियन पेंट्स, वोडाफोन इत्यादी अनेक सुप्रसिद्ध कंपन्यांच्या जाहिरातींच्या कल्पना त्यांनीच यशस्वी केल्या. 'मिले सुर मेरा तुम्हारा' हे लोकप्रिय गाणेदेखील त्यांनी लिहिले होते. ऑगिल्व्ही या जाहिरात कंपनीचे कार्यकारी अध्यक्ष असलेले पांडे यांना २०१६ साली पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या निधनाबद्दल अनेकांनी शोक व्यक्त करत आदरांजली वाहिली आहे.

## निवडक

### भारतानंतर अफगाणिस्तान अडवणार पाकिस्तानचे पाणी

**काबूल :** भारताने 'ऑपरेशन सिंदूर' वेळी पाकिस्तानसोबतचा सिंधू जल करार रद्द केला, ज्यामुळे पाकिस्तानला जाणारे पाणी बंद करण्यात आले. पाकिस्तानच्या अनेक भागात दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली. दरम्यान, आता तालिबानशासित अफगाणिस्तान पाकिस्तानला होणारा पाणीपुरवठा मर्यादित करण्याची व कुनार नदीवर धरण बांधण्याची तयारी करत आहे.

### संयुक्त राष्ट्रसंघात सुधारणा आवश्यक -एस. जयशंकर

**नवी दिल्ली :** संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेच्या ८०व्या वर्धापन दिनानिमित्त राजधानी दिल्लीमध्ये विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद व सदस्य देशांच्या धोरणांवर टीका केली. जयशंकर यांनी आरोप केला की, काही सदस्य देश दहशतवादी संघटनांना संरक्षण देतात, ज्यामुळे या आंतरराष्ट्रीय संस्थेची विश्वसनीयता धोक्यात येते. त्यांनी पुढे बोलताना संयुक्त राष्ट्रसंघात सुधारणा करणे ही आजच्या काळातली सर्वात मोठी आव्हाने आहेत, असेही ठामपणे सांगितले.

## खोपोलीतही बैलाच्या अफवेने काही काळ घबराटीचे वातावरण



**खालापूर : प्रतिनिधी**

पिसाळलेल्या बैलाच्या दहशतीने गुरुवारी कर्जतमधील वातावरण तणावग्रस्त झाले होते. या घटनेत एका वृद्धाला प्राण गमवावे लागले, तर पाच जण जखमी झाले आहेत. या घटनेची पुनरावृत्ती खोपोलीत होते की काय अशी परिस्थिती शुक्रवारी (दि. २४) सायंकाळी खोपोलीत दिसून आली, मात्र कर्जतच्या घटनेत आणि खोपोलीतील घटनेत विसंगती असल्याने खोपोलीकरांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय आवारात शुक्रवारी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास एक बैल वेसण सुटून पळाला. हा बैल रुग्णालयाच्या आवारात भेदरलेल्या अवस्थेत पळत असल्याने काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. अशा वेळी सामाजिक कार्यकर्ते व पोलिसांनी बैलाला पकडून झाडाला बांधून ठेवले.

बैल सुस्थितीत असल्याने कर्जतसारखा प्रकार नसल्याचे लक्षात येताच सर्वांनीच सुटकेचा निःश्वास टाकला. दरम्यान, बैलाच्या मालकाचा शोध घेण्यात येत आहे. अशा प्रकारे जनावरे मालकांनी मोकाट सोडू नयेत, अशी मागणी होत आहे.

## रिसॉर्ट मालकांना धमकावणाऱ्या तोतया पोलिसांचा पर्दाफाश; कर्जत पोलिसांची कारवाई

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील विविध रिसॉर्ट आणि फार्महाऊस मालकांना पोलीस अधिकारी असल्याचे भासवून धमकावणाऱ्या तोतयांचा कर्जत पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. कर्जत पोलिसांनी तपासचक्रे फिरवत फक्त २४ तासांमध्ये आरोपींवर कारवाई करीत रिसॉर्ट मालकांना रक्कम परत मिळवून दिली.



आरोपींनी आपले नाव एसपी शुभम आणि पोलीस निरीक्षक समीर सांगत रिसॉर्ट मालकांना धमकीचे फोन करून त्यांच्याकडून हजारो रुपयांची वसुली करीत होते. तुमच्या फार्मवर एक अल्पवयीन जोडपे आले होते. त्या मुलाने मुलीचे बेड सीन शूट केले आहेत. तुमच्यावर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल होणार आहे आणि तुमचा फार्म सील करण्यात येईल. आमची टीम पुण्यावरून रवाना झाली आहे, अशा पोलिसी भाषेत धमकावून आरोपी हे मालकांना भीतीत टाकत आणि सेटलमेंटच्या नावाखाली पैसे उकळत होते.

गुन्ह्यात अडकू नये या भीतीने काही फार्महाऊस मालक सेटलमेंटलादेखील तयार झाले. यामध्ये तालुक्यातील वारे येथील धनंजय म्हसे यांच्याकडून आरोपींनी १२ हजार रुपये, चेतन घुमरे यांच्याकडून १५ हजार रुपये आणि समीर कुडूसकर यांच्याकडून पाच हजारांची रक्कम ऑनलाईन हस्तांतरित करण्यात आली. टाटा पॉवर हाऊस येथील जयवंत भोसले यांनी मात्र धमकी न जुमानता रक्कम देण्यास नकार दिला होता.

सर्व व्यवहार आराध्या ज्ञानेश्वर दुधासे या खात्यावर करण्यात आला होता. फसवणुकीचा प्रकार अनेक रिसॉर्ट मालकांच्या सोबत झाल्याने तालुक्यातील भूमिपुत्र फार्म संघटनेचे अध्यक्ष उदय पाटील, बिपीन लाड आणि अनिल भोसले यांनी याबाबत ऑनलाईन तक्रार दाखल करीत कर्जत पोलिसांची भेट घेतली. तक्रार मिळताच पोलीस पथकाने शिताफीने तपास करून आरोपी शुभम आणि समीर दुधासे यांचा ठावठिकाणा शोधला आणि त्यांना पोलिसी खाक्या दाखवून फसवणूक केलेल्या रिसॉर्ट मालकांची संपूर्ण रक्कम परत करायला लावली. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

# रायगडच्या समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांची 'भरती'

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात पर्यटन हंगाम जोमात सुरू झाला आहे. दिवाळीचा सण आणि सलग सुट्ट्यांमुळे रायगडच्या समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी वाढली आहे. त्यामुळे अलिबाग, मुरूडसह जिल्ह्यातील बहुतांश पर्यटनस्थळे हाऊसफुल झाली आहेत. पर्यटकांच्या आगमनाने व्यावसायिकदेखील खुश झाले आहेत.





पावसाळ्यातील चार महिने कोकणात मुसळधार पाऊस पडतो. त्यामुळे मुंबईतून होणारी जलप्रवासी वाहतूक बंद असते. परिणामी पावसाळ्यात पर्यटन व्यवसायावर मंदीचे सावट असते. तुरळक पर्यटक येतात, परंतु पावसाळा संपला की कोकण किनारपट्टीवरील पर्यटन हंगाम पुन्हा जोमाने सुरू होतो. दिवाळीपासून फेब्रुवारी महिन्यापर्यंत, तर एप्रिलपासून जून महिन्यापर्यंत पर्यटकांची मोठी रेलचेल या ठिकाणी पहायला मिळते. सध्या याची प्रचिती रायगडमधील अलिबाग, मुरूड आणि श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटनस्थळांवर येत आहे आहे.

सलग सुट्ट्यांमुळे अलिबागमधील आवास, सासवणे, किहीम, वरसोली, अलिबाग, आक्षी, नागाव, चौल आणि रेवदंडा येथे साधारणपणे २५ हजार पर्यटक; तर मुरूड तालुक्यातील काशिद, नांदगाव, मुरूड या ठिकाणी १५ हजारहून अधिक पर्यटक दाखल झाले. याखेरीज श्रीवर्धनमधील दिवेआगर, हरिहरेश्वर या ठिकाणीही गर्दी झाली आहे.

पर्यटकांच्या आगमनामुळे रायगड जिल्ह्यातील रस्त्यांवर वाहनांची वर्दळ वाढली आहे. मुंबई, पुण्याकडून कोकणात येणाऱ्या पर्यटकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो आहे.

### स्थानिकांना सुगीचे दिवस

पर्यटकांच्या आगमनामुळे समुद्र किनारे फुलून गेले आहेत. स्थानिक व्यवसायिकांना यामुळे रोजगार संधी उपलब्ध झाल्या आहेत. बोटींग व्यवसायिक, वेगवेगळे साहसी जलक्रीडा प्रकार, स्टॉलधारक, नारळ विक्रेते यांचे व्यवसाय तेजीत असल्याचे पहायला मिळत आहे. पर्यटकांनी समुद्र स्नानाबरोबरच सागरी सफरीचा आनंद लुटला, एटीव्हीराईडस, बनाना राईडस अशा विविध प्रकारांची मजा घेतली. घोडसफारी आणि उंटसफारी केली. पर्यटकांचा ओघ वाढल्याने जिल्ह्यातील हॉटेल्स आणि लॉजेस पर्यटकांनी गजबजून गेले. त्यामुळे पर्यटनावर आधारित उद्योगांना सुगीचे दिवस आल्याचे दिसून येत आहे.

## तरुणीवर चाकूहल्ला करून तरुणाची आत्महत्या

**मुंबई : प्रतिनिधी**

तरुणीवर चाकूने हल्ला केल्यानंतर तरुणाने आत्महत्या केल्याची घटना मुंबईतील काळाचौकी परिसरात शुक्रवारी (दि. २४) घटना घडली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणीचा रुग्णालयात मृत्यू झाला.

या घटनेतील तरुणाचे नाव सोनू बराय (वय २४), तर तरुणीचे नाव मनिषा यादव (वय २४) आहे. मिळालेल्या माहितीनुसार दोघांमध्ये प्रेमसंबध होते. सोनू वारंवार मनिषावर संशय घेत होता. यावरून दोघांमध्ये आठ दिवसांपूर्वी वाद आणि नंतर ब्रेकअप झाला. सोनूने शेवटचे भेटण्यासाठी मनिषाला बोलावले होते. तेव्हा दोघांमध्ये वाद झाला. यावेळी राग अनावर झालेल्या सोनूने मनिषावर धारदार शस्त्राने वार केले. या हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी ती जवळच असलेल्या आस्था नर्सिंग होममध्ये शिरली. सोनूने तिचा पाठलाग करत पुन्हा हल्ला केला.

या हल्ल्यात मनिषा गंभीर जखमी झाली. तिच्यावर हल्ला केल्यानंतर त्याच शस्त्राने सोनूने स्वत:चा गळा चिरला. यामध्ये त्याचा मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या मनिषाचीही प्रकृती चिंताजनक होती. मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्रावामुळे अखेर केईएम रुग्णालयात उपचारादम्यान तिचा मृत्यू झाला.

# प्राकृतिक कृषी संमेलन : महाराष्ट्राला नैसर्गिक शेतीचे हब बनवण्याचा संकल्प

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी राजभवन, मुंबई येथे 'प्राकृतिक कृषी संमेलन २०२५' मोठ्या उत्साहात झाले.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले की, नैसर्गिक शेती ही केवळ शेतीची पद्धत नसून ती शाश्वत शेतीकडे नेणारी एक सर्वसमावेशक दृष्टी आहे. रासायनिक खतांसह बियाणांचा अतिवापर जमिनीची सुपीकता कमी करत आहे, त्यामुळे उत्पादन खर्च वाढत असून शेतकऱ्यांवर संकट येत आहे.

अशा स्थितीत नैसर्गिक शेती ही निसर्गाशी सुसंगत आणि नफा वाढवणारी दिशा ठरते. निसर्गाने दिलेल्या प्रत्येक घटकाचा उपयोग करून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करता येतो आणि पर्यावरणाचा समतोल राखत शाश्वत विकास साधता येतो.

२०१४ मध्ये महाराष्ट्र शासनाने नैसर्गिक शेती मिशन सुरू केले होते, ज्या अंतर्गत १४ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्यात आले. २०२३ साली राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या व्याख्यानानंतर नव्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचा निर्णय घेण्यात आला.

वातावरणातील बदलांचा शेतीवर होणारा परिणाम लक्षात घेता, पुढील काळात शेती नैसर्गिक शेतीच्या दिशेने नेणे अत्यावश्यक असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधोरेखित केले.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये गोसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. गोमातेचे शेतीतील स्थान अत्यंत महत्त्वाचे असून, गोधन टिकवणे म्हणजेच शेतीचा जीव टिकवणे आहे. त्यामुळे गोधन आणि नैसर्गिक शेती यांचा परस्परसंबंध पुन्हा प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी नैसर्गिक शेतीविषयी केलेले प्रयोग प्रेरणादायी असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात नैसर्गिक शेतीचे मोठे मिशन राबवले जाईल. नैसर्गिक शेतीच्या गटांच्या माध्यमातून प्रत्यक्ष कार्यान्वयन करीत, शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवू आणि महाराष्ट्राला नैसर्गिक शेतीचे पुढचे हब बनवू, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

## दारूमाफियांवर रोहा पोलिसांची कारवाई

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात अवैध दारू व्यवसायाला रोखण्यासाठी पोलिसांनी पुन्हा एकदा जोरदार धडक कारवाई करत गावठी दारू तयार करण्यासाठी लागणाऱ्या काळ्या गुळाची मोठी खेप पकडली आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ६ लाख ८९ हजार ६०० किमतीचा अवैध माल जप्त केला असून, दारू माफियांना अक्षरशः हादरा बसला आहे.



गुरुवारी (दि. २३ ऑक्टोबर) रोहा चणेरा रोडवरील खारी चेक पोस्ट येथे गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून एमएच ४२ बीएफ ७३९२ क्रमांकाची पांढरी बोलेरो गाडी थांबवली असता, गाडीत गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारा काळा गूळ सापडला. तत्काळ कारवाई करत पोलिसांनी बोलेरोसह माल ताब्यात घेतला.या कारवाईत संजय म्हात्रे (वय २३, रा. पिंपळगाव, ता. दौंड, जि. पुणे) आणि काशिनाथ रामा लांभोरे (वय २६, रा. वाघिरपट्टी, ता. रोहा, जि. रायगड) अशी दोन आरोपींची नावे समोर आली आहेत. दोघांविरुद्ध गुन्हा क्रमांक २५३/२०२५ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(फ) व ८३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जप्त मालामध्ये ८९,६०० किमतीचा काळा गूळ (३५० ढेप, प्रत्येकी ८ किलो वजन, प्रति ढेप २५६) तसेच ६ लाख किमतीची बोलेरो पिकअप गाडी (एमएच ४२ बीएफ ७३९२) असा एकूण ६,८९,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात फिर्यादी पोलिस कर्मचारी शरद काशिनाथ कोटकर असून, पुढील तपास सुरू आहे.

## इंद्रधनुष्याने खुलले आभाळ; आनंदाने रंगला श्रीवर्धन किनारा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धनच्या निळ्याशार समुद्रावर आज आकाशाने रंगांची उधळण केली! हलक्या सरींनंतर उमटलेल्या इंद्रधनुष्याने जणू निसर्गाने आपली रंगपेटी खुली करून टाकली. सागरावर तरंगणाऱ्या लाटा त्या रंगांच्या प्रकाशात चमकू लागल्या आणि श्रीवर्धनचा किनारा रंगांनी न्हावून निघाला. पाहणाऱ्याच्या मनात प्रसन्नता, आनंद आणि शांततेची लहर निर्माण झाली.




किनाऱ्यावर नांगरलेल्या मच्छिमार बोटी वाऱ्याच्या हलक्या झुळकांमध्ये अलगद डोलत होत्या. समुद्रात सध्या मच्छी कमी मिळत असली तरी आज या दृश्याने प्रत्येक मच्छिमाराच्या चेहऱ्यावर आशेचं हसू उमटलं. काहींनी आकाशाकडे पाहत हा निसर्गच आपल्याला नव्या दिवसाची खूण देतो, असं समाधानाने म्हटलं.

पर्यटकांसाठी हा क्षण जणू स्वप्नवत ठरला. कोणी त्या इंद्रधनुष्याखाली उभं राहून फोटो टिपत होते, तर कोणी त्या रंगीत कमानीकडे निरखून पाहत क्षणात हरवून गेले होते. लाटांचा मंद या दोन रेषा जणू आयुष्याच्या आनंदाचा आणि निरागसतेचा सुंदर संगम बनल्या. श्रीवर्धनचा हा दिवस, सागराचा हा स्पर्श, आणि आभाळाची ही रंगीत मिठी– पाहणाऱ्याच्या मनात कायमचा

## कर्जतमध्ये वेगवेगळ्या घटनांत तिघांचा मृत्यू

**कर्जत :** यंदा पावसाने दिवाळसणावर पाणी फेरले तसेच एकाच दिवसात वेगवेगळ्या दुर्घटनांमध्ये तीन जणांचा मृत्यू झाल्याने कर्जतकरांना यंदाची भाऊबीज दुःखदायक ठरली. त्यामुळे कर्जत परिसरात शोककळा पसरली. भाऊबिजेच्या दिवशी पहाटे एका पिसाळलेल्या बैलाने हल्ला केल्याने दहिवली भागातील अर्जुन म्हसे या सत्तर वर्षीय जेष्ठ नागरिकाला जीव गमवावा लागला. त्यानंतर नेरळ नजिकच्या पिंपळोली गावातील मल्हार गोविंद सोनवळे हे घरी जात असताना त्यांचा वाहनावरील ताबा सुटुन वाहन भिंतीला आदळले.त्यात त्यांचा मृत्यू झाला. तसेच १२ ऑक्टोबर रोजी रिक्षा व कार अपघातात जखमी झालेले प्रशांत गायकवाड यांचा भाऊबीजेच्या दिवशीच मृत्यू झाला.

## भाई सुर्वे यांचा राष्ट्रवादीत काँग्रेसमध्ये प्रवेश

**मुरुड : प्रतिनिधी**

प्रत्येक व्यक्तीकडे स्वाभिमान आहे, परंतु काही लोक आपली तत्वे लादण्यासाठी दुसऱ्यांवर जोरजबरदस्ती करतात. कार्यकर्ता हा महत्वाचा दुवा असून त्यांच्या सूचना सुद्धा ग्राह्य ठेवल्या पाहिजेत. मुरुड तालुका हा सुसंस्कृत असून निसर्गाचे वरदान असलेल्या तालुक्यातील व्यक्ती अपमान कदापि सहन करू शकत नाहीत. भाई सुर्वे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेश हा लाभदायी ठरणार असून आगामी काळात सुर्वे यांना ताकद देण्याचे काम पक्षातर्फे केले जाणार असून प्रत्येकाच्या दिव्याखाली अंधार असून त्यामुळे आरोप करण्यापूर्वी विचार करणे खूप गरजेचे आहे, असे रोखठोक प्रतिपदान खासदार सुनील तटकरे यांनी केले आहे.



यावेळी व्यासपीठावर मुरुड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे,प्रमुख नेते मनोज भगत,माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर,माजी जिल्हा परिषद सदस्य सुबोध महाडिक,माजी सरपंच अजित कासार,महिला तालुका अध्यक्ष ऍड.मृणाल खोत,मुरुड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ,मुरुड शहर महिला अध्यक्ष शीतल घरत ,सचिव विजय पैर,माजी सभापती बाबू नागावकर,मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उपाध्यक्ष शाम कोतवाल,माजी सरपंच मनीष नांदगावकर,भाई सुर्वे आदी उपस्थित होते.

शिवसेनेचे प्रमुख नेते असणारे भाई सुर्वे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्तेसह खासदार सुनील तटकरे यांच्या समक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये प्रवेश केल्याने शिवसेनेला मोठे खिंडार पडले आहे.आगामी होणाऱ्या नगरपरिषद व जिल्हा परिषद निवडणूक मध्ये हा पहिलाच धक्का मुरुड तालुक्यात शिवसेनेला बसला आहे.भाई सुर्वे यांच्या सोबत माजी सभापती अभिषेक काते, किरण खोपकर, विघ्नेश सुर्वे, समीप आडुळकर, महेश भिसे, सेव्हन भाटकर यांनी पक्ष प्रवेश केला आहे.त्यामुळे निवडणूक सुरु होण्याअगोदरच शिवसेनेला मोठा फटका बसला आहे.यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना खासदार सुनील तटकरे म्हणाले कि,नियती सर्व हिशोब चुकते करीत असते.

## पनवेल परिसरात एकाच दिवशी लागली दोन ठिकाणी आग

### अग्निशमन विभागामुळे इसमाचा जीव वाचला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात एकाच दिवसात दोन ठिकाणी आग लागल्या. मात्र अग्निशमन विभागाच्या तत्परतेने इसमाचा जीव वाचला आहे.






पनवेलजवळील पळस्पे फाटा परिसरात एका गळ्याला अचानक आग लागून मोठे नुकसान झाले आहे. पळस्पे येथील दत्त स्नॅक्सजवळ असलेल्या पीके वाईन्स शेजारील या गाळ्याला आग लागल्याची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली.

आगीमुळे या परिसरात दाट धुराचे लोट पसरले होते, ज्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी रवाना झाले. त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून काही वेळातच आग आटोक्यात आणली, अन्यथा मोठे संकट ओढवले असते.

दुसऱ्या घटनेत नवीन पनवेल सेक्टर-४ मधील कॉटेज एन.जी. प्लॉट क्र. ८९ येथील इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर शुक्रवारी दुपारी आग लागण्याची घटना घडली. सदर आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन विभागाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी पोहोचल्यावर गॅलरीतून मोठ्या प्रमाणात ज्वाळा आणि धूर बाहेर पडत असल्याचे दिसून आले.

परिस्थिती गंभीर असल्याने दरवाजा हातोड्याच्या सहाय्याने तोडून जवानांनी घरात प्रवेश केला. पाणी मारून आग नियंत्रणात आणली.

दरम्यान, किचनमध्ये एक पुरुष बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. जवानांनी कोणताही विलंब न करता त्याला सुरक्षित बाहेर काढत ॲम्बुलन्सच्या मदतीने तातडीने पुढील उपचारासाठी रवाना केले.

याचबरोबर इमारतीच्या वरच्या मजल्यावर अडकलेल्या एका कुत्र्यालाही अग्निशमन दलाने यशस्वीपणे रेस्क्यू करून सुरक्षित बाहेर काढले. त्यामुळे त्याचेही प्राण वाचले.

## रायगड दिंडी कार्तिकी पायी तीर्थयात्रेचे कोशिंबळे येथे स्वागत

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील पारंपरिक कार्तिकी पायी दिंडी तीर्थ यात्रा २०२५ यावर्षीही अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावाने पार पडली. या यात्रेच्या दरम्यान दिंडीचे कोशिंबळे गावात मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले.



कोशिंबळे गावात समाजसेवक विजय बक्कम यांच्या हस्ते दिंडीचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी गेल्या २२ वर्षांपासून महाप्रसादाचे आयोजन करून भाविकांना सेवा देण्याचे सौभाग्य बक्कम परिवाराला लाभले आहे. या अखंड सेवाभावी परंपरेमुळे बक्कम कुटुंबाचे समाजात विशेष कौतुक होत आहे.

यावेळी सहदेव बक्कम (माजी सरपंच), संजय बक्कम, संगीता बक्कम, सभापती दीपक उभारे, उपसरपंच सुषमा बक्कम, नागेश शेंपुडे तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.दिंडी आगमनावेळी पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात, टाळ-मृदुंगाच्या निनादात, आणि विठ्ठलनामाच्या गजरात गावात आध्यात्मिक उर्जा पसरली.

महाप्रसादात शेकडो भाविकांनी सहभागी होत विठ्ठल नामस्मरणाचा आनंद घेतला. समाजसेवक विजय बक्कम यांनी या निमित्ताने गावकऱ्यांचे अभिनंदन करत सांगितले की, गेल्या दोन दशकांहून अधिक काळ चालत असलेली ही सेवा ही खरी भक्ती आणि समाजसेवेचे सुंदर उदाहरण आहे.दिंडी यात्रेचा हा टप्पा कोशिंबळे ग्रामस्थांसाठी केवळ धार्मिक सोहळा नव्हे, तर एकात्मता, श्रद्धा आणि सेवाभाव यांचे प्रतीक ठरला.

## वाकी-हरवंडी पुलाचे मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते उद्घाटन

### पुढील रस्त्याच्या कामासाठी डिसेंबरपर्यंत निधीची तरतूद करण्याची ग्वाही

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

महाड विधानसभा मतदार संघातील माणगाव तालुक्यातील वाकी ते हरवंडीकडे जाणाऱ्या मोठ्या पुलाचा उदघाटन समारंभ शुक्रवार दि.२४ ऑक्टोबर रोजी राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्याहस्ते उत्सहात झाला.






या उदघाटन सोहळ्यास शिवसेनेचे दक्षिण रायगड संपर्क प्रमुख अरुण चाळके,जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर,जिल्हा प्रमुख उरण अतुल भगत,तालुका प्रमुख उरण दिपक ठाकूर,उपजिल्हा प्रमुख परेश पाटील,उद्योजक मंगेश पोळेकर,युवासेना उपजिल्हा प्रमुख अविनाश नलावडे,युवासेना जिल्हा सचिव अच्युत तोंडलेकर,उपतालुका प्रमुख नितीन पवार,निजामपूर विभाग प्रमुख मनोज सावंत,निजामपूर विभाग महिला संघटिका मुग्धा पोळेकर,माजी विभाग प्रमुख गणेश समेळ,पूर्व विभाग उपविभाग प्रमुख संदीप गावडे आदी मान्यवरांसह ग्रुप ग्रामपंचायत करंबेळी,वाकी,हरवंडी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना ना.भरत गोगावले म्हणाले, मंगेश पोळेकर यांनी १०० दिवसांत या पुलाचे काम चांगल्या पद्धतीने पूर्ण केले. त्या पुलाचे उदघाटन करताना मला अत्यंत आनंद होत आहे. या पुलाच्या पुढील जो वाकी गावाकडे तसेच पुढे कोस्ते गावाकडे जाणारा रस्ता आहे त्या रस्त्याच्या कामासाठी लागणाऱ्या अडीच कोटी रुपयांच्या निधीची तरतूद डिसेंबरपर्यंत करून या कामाची सुरुवात केली जाईल.

## खालापूरमध्ये जोरदार वादळी पावसात झोपडी उन्मळून पडली

**चौक : प्रतिनिधी**

देवतारी त्याला कोण मारी असे म्हणतात त्याचा प्रत्यय गुरुवारी संध्याकाळी सुरेश बारकु कातकरी राहणार वावंढळ तालुका खालापूर यांचे घर नजरेसमोर जमीनदोस्त झाल्याने ते बेघर झाले.पण गर्मी सहन न झाल्याने अंगणात गेले म्हणून त्यांचे पूर्ण कुटूंब वाचले.



दिवसभर मोलमजुरीचे काम करून घरी आलेली सुरेशची आई पुन्हा घरकाम करून थकून गेली होती, त्यातच आपल्या झोपडीत फार गर्मी जाणवु लागल्याने नातवांना घेऊन अंगणात गार वारा अंगावर घेत होती. अंगणात नातवंडे इतर मुलांसोबत खेळत होती, शेजारच्या घराच्या ओसरीवर आजोबा बारकु कातकरी हे मुलांचा खेळ बघत रमून गेले असता जोरदार वाऱ्याची हजेरी लागून झोपडी हलु लागली त्यातच जोरदार पावसाने हजेरी लावून झोपडी जमीनदोस्त केली.

सुदैवाने घरातील माणसे बाहेर गेल्याने जीवितहानी झाली नाही पण निवारा उडवून गेला. ग्राम पंचायत सदस्य नाना पवार यांनी ही माहिती शासकीय यंत्रणेला देऊन धीर दिला. तहसीलदार अभय चव्हाण ,मंडळ अधिकारी माणिक सानप, महसूल ग्राम अधिकारी उदय देशमुख यांनी घटनेची दखल घेतली. शेजारच्या भावाच्या घरात तात्पुरती सोय करण्यात आली आहे.

## निवडक

### अपघातात माकडाचा मृत्यू

**पनवेल :** पळस्पे वाहतूक शाखेच्या हद्दीमध्ये मुंबई गोवा हायवे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ कर्नाळा अभयारण्य जवळ गोवा जाणाऱ्या लेनवर काळ्या रंगाची होंडा कंपनीची यूनिकॉन दुचाकी जात असताना दुचाकी समोर अभयारण्यातील माकड आडवे आले. हे माकड दुचाकीमध्ये अडकून दुचाकी रस्त्यावर पडून अपघात झाला. या अपघातामध्ये दुचाकी (एमएच ०६ सीके ६४२५) वरील चालक किरकोळ जखमी झाला आहे व पाठीमागे बसलेला युवक गंभीररित्या जखमी झाला आहे. नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या अंमलदार यांनी या ठिकाणी ॲम्बुलन्स बोलावून जखमींना गांधी हॉस्पिटल पनवेल या ठिकाणी उपचारासाठी पाठवण्यात आले. या अपघातामध्ये माकडाचा मृत्यू झाला आहे.

### लाकडी बांबूने केली मारहाण

**पनवेल :** चिकनच्या हड्डीवरून लाकडी बांबूने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी आरोपी अप्पू वंडाल उर्फ बाब्या (रा. नौपाडा, कामोठे) याच्याविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २१ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सलमान मोहम्मद इस्लाम सिद्दिकी हा कामोठे, सेक्टर २२ येथे राहत असून तो स्टार चिकन शॉप नौपाडा गाव, कामोठे येथे चिकन विकत असताना आरोपी अप्पू वंडाल हा चिकनच्या दुकानावर चिकनची राहिलेली हड्डी मागू लागला. या वेळी दुकानावर गिऱ्हाईक असल्याने सलमान याने त्याला थांबण्याकरता सांगितले. त्याचा राग आल्याने त्याने दमदाटी करून शिवीगाळ केली. आणि लाकडी बांबूने सलमानच्या डोक्यावर मारहाण करून त्याला जखमी केले.

### अनोळखी इसमाचा आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्यांच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. अनोळखी बेवारस व्यक्ती वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे, अंगात नेसुस काळी ट्रॅक पॅट व मळकट पांढरा शर्ट घातलेला, कपाळाला व नाकाला खरचटलेले, अंगाने मध्यम असे वर्णन आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधावा.

# पनवेल मनपा क्षेत्रात अग्निशमन दलाला बळकटी

## कामोठे वसाहतीमध्ये होणार सर्वात मोठे केंद्र

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रातील सर्वात मोठे अग्निशमन दलाचे केंद्र कामोठे उपनगरातील मानसरोवर रेल्वेस्थानकासमोरील चौकातील सूमारे ७ हजार चौरस मीटर जागेवर उभारले जाणार आहे. पनवेल महापालिका प्रशासनाने याबाबतच्या सर्व तांत्रिक बाबी पुर्ण केल्या असून २८ कोटी रूपये खर्च करून बांधल्या जाणाऱ्या अग्निशमन दल केंद्राची इमारत हायटेक पद्धतीची उभारण्यासाठी निविदा प्रक्रिया लवकरच पार पाडली जाईल.

कामोठे उपनगराची वाढती लोकसंख्या ध्यानात घेऊन येथे अग्निशमन दलाचे केंद्र उभारावे अशी मागणी येथील रहिवाशी तसेच सामाजिक संस्था आणि राजकीय संघटनांकडून वारंवार केली जात होती. या मागणीचा विचार करून सिडको मंडळाकडून मोक्याचा भूखंड मिळण्यासाठी पनवेल महापालिकेचा पाठपुरावा सुरू होता. सिडकोकडून संबंधित भूखंड ताब्यात घेतल्यावर या भूखंडावर बांधण्यात येणाऱ्या केंद्राच्या आराखड्यानूसार खर्चाला पनवेल महापालिका प्रशासनाने नूकतीच मंजूरी दिली. याबाबतची निविदा प्रक्रिया पार पडल्यानंतर बांधकामाला सुरूवात होईल.



कामोठे येथील हे अग्निशमन दलाचे केंद्र सुरू झाल्यावर येथे दोन अग्निशमन बंबासह ४० अग्निशमन दलाचे जवान तैनात करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. या दलाच्या केंद्रामध्ये भविष्यात नवी मुंबई, सिडको मंडळ आणि पनवेल महापालिकेचे संयुक्त नियंत्रण कक्ष केंद्र (इंट्रीग्रेटेड कंट्रोल रूम सेंटर) यामध्ये उभारला जाईल. या केंद्रात आपत्ती व्यवस्थापनासह तीनही यंत्रणेचे अग्निशमन अधिकारी एकत्र बसू शकतील. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची हॉटलाईनलासुद्धा याच केंद्रातून समन्वय साधला जाईल.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून ८ किलोमीटरच्या अंतरावरील सर्वच अग्निशमनच्या यंत्रणेसोबत विमानतळ व्यवस्थापन करारबद्ध असल्यामुळे आगीच्या आपत्तीवेळी संयुक्त यंत्रणा एकामेकांना सहकार्य करणार असा हा करार असल्यामुळे या करारामुळे पनवेलच्या अग्निपंखात बळ येणार आहे. कामोठे हायटेक अग्निशमन दलाच्या बांधण्याचा पहिल्या टप्प्यात फायर स्टेशन आणि कार्यालयासाठी चार मजली इमारत असणार आहे. सध्या पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या सेवेत १६ अग्निशमन बंब आणि १५८ कर्मचारी व अधिकारी आहेत.

कामोठे येथील नवीन अग्निशमन दल सुरू झाल्यानंतर अजून ४० ते ५० कर्मचारी वाढण्याची शक्यता आहे. अजूनही तीन बंब नव्याने खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सध्या पनवेल महापालिकेकडे सातव्या मजल्यापर्यंत उंचीवर अग्निशमन दलाचे जवान आणि बंबासह पाण्याचा मारा करता येऊ शकते अशी व्यवस्था आहे. सिडको मंडळ आणि नवी मुंबई महापालिकेकडे २२ मजल्यापर्यंत उंच अग्निबंबाचे पाणी पोहचू शकेल अशी यंत्रणा आहे.

## गुळसुंदे येथून मायलेक बेपत्ता





**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गुळसुंदे येथे भाड्याने राहणारी अनिता मनिप गोंड (वय २५) हि तिच्या तीन वर्षांच्या मुलास घेवून बेपत्ता झाल्याची घटना घडली.

याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात पती मनिप रिंकू गोंड याने हरविल्याची तक्रार केली आहे. गुळसुंदे येथील राहत्या घरातून अनिता मनिप गोंड मुळ गाव-जगदीशपुर-उत्तरप्रदेश, सध्या राहणार गुळसुंदे हि कोणास काहीएक न सांगता मुलगा आर्यन यांस घेवून गेली आहे. अनिता मनिप गोंड (वय २५) हि रंगाने गोरी,अंगाने मध्यम,उंची पाच फुट, चेहरा गोल, अंगात राखाडी रंगाची साडी परिधान केली असून पायात चप्पल, सोबत तीन वर्षांचा आर्यंन मुलगा तसेच बॅग असून त्यामध्ये तिचे व मुलाचे कपडे आहेत.

याप्रकरणी रसायनी पोलिसांत मनुष्य मिसिंग दाखल झाली असून कोणास आढळल्यास महिला पोलीस सोनम शेळके (८७९३१६३३४३), रसायनी पोलीस ठाणे (८५३०४४९६९५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




**पनवेल : इमेज क्रिएशनच्या माध्यमातून पत्रकार नाना करंजुले यांनी संपादित केलेल्या ज्ञानज्योत दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. या वेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सतीश पाटील, सचिव दौलत शिंदे, शिवसेनेचे कळंबोली शहरप्रमुख तुकाराम सरक, सचिन गायकवाड, संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्था अध्यक्ष वैशाली जगदाळे, शिक्षणतज्ज्ञ मंदाकिनी पाटील, शैक्षणिक समुपदेशक मधुरा दंडवते, पत्रकार रवींद्र गायकवाड, तुळशीराम बोरुले आदी उपस्थित होते.**

## इको गाडी तलावात कोसळली

**पनवेल : वार्ताहर**

मोहो गावात पार्किंगची सोय अपुरी असल्याने तलावाभोवती अनेक जण वाहन पार्किंग करतात, मात्र हीच सवय एका वाहनचालकासाठी चांगलीच धोकादायक ठरली. हँडब्रेक न लावता पार्किंग केलेली प्रवासी इको गाडी थेट तलावात कोसळली.



या घटनेची माहिती समजताच परिसरात मोठी गर्दी झाली. ग्रामस्थांच्या मदतीने आणि जेसीबीच्या सहाय्याने सुमारे दोन तासांच्या प्रयत्नांनंतर गाडी तलावातून बाहेर काढण्यात आली. पार्किंग केलेली प्रवासी गाडी थेट तलावात कोसळली, सुदैवाने जीवितहानी टळली सुदैवाने गाडीत प्रवासी नसल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र वाहनाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. गावातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या या तलावाभोवती सुरक्षा कठडे नसल्याने अपघाताचा धोका कायम आहे.

रस्ता वळणदार असल्याने विशेषतः नवीन वाहन चालकांना वळणाचा अंदाज येत नाही आणि त्यामुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता वाढते. तलावाभोवती सुरक्षा कठडे उभारणे अत्यंत गरजेचे आहे. मोठी दुर्घटना घडण्याआधी प्रशासनाने तातडीने कठडे उभारावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

## खानाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी हरिश्चंद्र गोंधळी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खानाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी हरिश्चंद्र गोंधळी यांची बिनविरोध निवड झाली आहे. याबद्दल भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी पुष्पगुच्छ देऊन नवनिर्वाचीत उपसरपंच गोंधळी यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



या वेळी भाजप नेते संजय पाटील, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, भाजप नेते द्वारकानाथ बोलाडे, मनोहर अरिवले, सरपंच चंदा वारदे, माजी सरपंच निलम अरिवले, जयश्री दिसले, माजी उपसरपंच बाळाराम पाटील, ग्रामपंचायत सदस्या अर्चना दिसले, रवि कर्णूक, हेमंत पाटील, सुनील खाने, संतोष बोलाडे, एकनाथ फराड, बळीराम भोईर, दिलीप वाघे, संतोष वाघे, बबन नाईक, योगेश गोंधळी, रोहिदास गोंधळी, सचिन गोंधळी, गुरु गोंधळी, दशरथ गोंधळी, दिनेश गोंधळी, राजेंद्र गोंधळी, आकाश जाधव, नरेश नाईक, राजेंद्र पाटील, निलेश वारदे, नवनाथ पवार, लहु वाघे, यशवंत वाघे, गणेश खाने, संतोष घागस, गजानन घागस, प्रतिक बडेकर आदी उपस्थित होते.

दरम्यान, हरिश्चंद्र गोंधळी यांचे उपसरपंचपदाबद्दल अभिनंदन होत आहे.

## खारघरमध्ये वाहन पार्किंगचे नियोजन करा

### भाजप जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर परिसरातील वाढत्या वाहन पार्किंग समस्येच्या पार्श्वभूमीवर भाजप रायगड उत्तर जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांनी पनवेल महानगरपालिकेकडे व सिडकोकडे वाहन पार्किंग झोन व नियोजित पार्किंग ग्राउंड करण्याबाबत लेखी विनंती केली आहे.

खारघरमध्ये झपाट्याने वाढणाऱ्या निवासी संकुलांमुळे, व्यापारी प्रतिष्ठानांमुळे, शैक्षणिक संस्थांमुळे तसेच सेंट्रल पार्क व पांडवकडा धबधबा येथे वाढलेल्या पर्यटकांमुळे पार्किंगची समस्या तीव्र झाली आहे. रस्त्यांच्या कडेला अनधिकृतपणे वाहने उभी केल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो तसेच नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागतो.

या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन भाजपचे ब्रिजेश पटेल यांनी खारघर परिसरात नियोजित व संगठित वाहन पार्किंगची सुविधा विकसित करण्याची मागणी पनवेल महानगरपालिका व सिडकोकडे केली आहे.

अशा सुविधा निर्माण झाल्यास वाहतुकीवरील ताण कमी होईल आणि नागरी व्यवस्थापन व सुरक्षेच्या दृष्टीनेही सुधारणा होईल, असे त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे.



**पनवेल : चिंध्रण पाले येथील गौरव भोईर यांच्या नवीन घराच्या वास्तूशांतीनिमित्त भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. या वेळी भाजप पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. भोईर कुटुंबियांकडून सर्वांचे स्वागत करण्यात आले.**

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विविध दिवाळी अंकांचे प्रकाशन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी सणाची परंपरा जपत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी दिवाळी अंकांचे प्रकाशन करण्यात आले. पत्रकार निलेश सोनावणे संपादित 'साप्ताहिक पनवेल युवा' आणि पत्रकार दीपक महाडिक संपादित 'साप्ताहिक कोकण संध्या' या दिवाळी अंकांचे प्रकाशन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी साप्ताहिक रायगड मनोगतच्या श्री स्वामी समर्थ विशेष अंकालाही शुभेच्छा दिल्या.

या प्रकाशन सोहळ्याला राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस शिवदास कांबळे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडु, आरपीआयचे पनवेल महानगर पालिका जिल्हा अध्यक्ष प्रभाकर कांबळे, कार्याध्यक्ष मोहन गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष अमोल इंगोले, 'पनवेल युवा'चे संपादक निलेश सोनावणे, ज्येष्ठ पत्रकार व 'साप्ताहिक रायगड मनोगत'चे कार्यकारी संपादक संजय कदम, 'कोकण संध्या'चे संपादक दिपक महाडिक, मुख्य संपादक केवल महाडिक, संतोष आमले, शंकर वायदंडे, अण्णासाहेब आहेर, राम बोरिले, अनिल कुरघोडे, लालचंद यादव, सुनील वारगडा, रविंद्र गायकवाड, नितीन जोशी, निखिल गुंदेच्छा, शशिकांत दळवी आणि अनुराग वाघचोरे यांच्यासह अन्य मान्यवर आणि पत्रकार उपस्थित होते.





**पनवेल : पाली देवद (सुकापूर) ग्रामपंचायतीचे सदस्य महेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी जि.प. सदस्य अमित जाधव, भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, यतिन पाटील, चंद्रकांत पोपेटा आदी उपस्थित होते.**

## ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस समारंभ

**उरण : वार्ताहर**

ज्येष्ठ नागरिक मंडळ मुळेखंड, तेलीपाडा, कुंभारवाडा, कोळीवाडा आणि परिसर वतीने ज्येष्ठ नागरिक वाढदिवस समारंभाचे औचित्य साधून उरण तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांचा मंडळाचे अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, कार्याध्यक्ष अनंत पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यांत आला.



सत्कारावेळी उरणचे तहसीलदार डॉ.उद्धव कदम ज्येष्ठ नागरिक मंडळास मोलाचे मार्गदर्शन केले. पुढील काळात जेष्ठ नागरिकांना ओळख पत्र, आरोग्य शिबिर घेण्यात येतील. संजय गांधी निराधार योजना या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

या वेळी अध्यक्ष प्रकाश पाटील, कार्याध्यक्ष अनंत पाटील, चाणजे ग्रामपंचायत सरपंच अजय म्हात्रे, ॲड.दत्तात्रेय नवाळे, उपाध्यक्ष अंकुश म्हात्रे, सेक्रेटरी परशुराम पाटील, खजिनदार ईश्वर म्हात्रे, सहसेकेटरी सुभाष गुरव, हरिचंद्र म्हात्रे, सर्व सदस्य व महिला वर्ग उपस्थित होता.

## संपादकीय

# आर्थिक परिणाम अटळ?

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी युक्रेन युद्ध थांबवून शस्त्रसंधीसाठी तयार व्हावे या उद्देशाने अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाच्या दोन सर्वात मोठ्या तेल कंपन्यांवर आर्थिक निर्बंध लादले आहेत. याचा फटका रशियाच्या अर्थव्यवस्थेला बसेल असे म्हटले जाते आहे. रशियावर एकतर्फी निर्बंध लादले जाण्याला भारताचा कायमच विरोध राहिला आहे. आता या निर्बंधांचा भारतावर काय परिणाम होतो हे पहावे लागेल.

**युक्रेनविरोधातील युद्ध थांबवून शांतता चर्चा करण्यासाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना भाग पाडावे या उद्देशाने अमेरिकेने बुधवारी रशियाच्या दोन सर्वात मोठ्या तेल कंपन्यांवर निर्बंध लादले. रोझनेफ्ट आणि ल्युकऑइल या दोन रशियन कंपन्यांवर तसेच त्यांच्या उपकंपन्यांवर देखील निर्बंध लादले गेले आहेत. युरोपीय युनियननेही रशियावर आणखी आर्थिक निर्बंध लादले आहेत. यापूर्वी ट्रम्प पुतिन यांच्याशी चर्चेच्या पर्यायाचा विचार करत होते. दोन महिन्यांपूर्वी पुतिन यांच्याशी चर्चा केल्यानंतर ट्रम्प यांनी पुतिन यांना युद्ध थांबवण्याच्या दृष्टीने तयार केल्याचा गाजावाजा केला होता. परंतु त्यानंतर परिस्थितीत काहीच फरक न पडल्याने ट्रम्प यांनी पुतिन यांच्याशी पुन्हा चर्चा करण्याऐवजी रशियावर कडक निर्बंधांची घोषणा केली आहे. या निर्बंधांनुसार रोझनेफ्ट आणि ल्युकऑइल या कंपन्या जगभरात कुठेही तेल विकू शकणार नाहीत. रोझनेफ्ट ही रशियातील पहिल्या क्रमांकांची तेल कंपनी असल्यामुळे या निर्बंधांचा रशियाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होईल असे म्हटले जाते आहे. परंतु निर्बंधांचा आपल्यावर कोणताही परिणाम होणार नाही असा दावा रशियाच्या सरकारी अधिकाऱ्यांनी व सरकारी प्रसारमाध्यमांनी केला आहे. युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी मात्र या उपायांचे स्वागत केले असून हा आपला विजय आहे असे म्हटले आहे. अतिरिक्त निर्बंधांच्या बातम्यांमुळे गुरुवारी आंतरराष्ट्रीय कच्च्या खनिज तेलाचे दर प्रतिबॅरल दोन डॉलरने वाढले. हे निर्बंध २१ नोव्हेंबरपर्यंत लागू होणार नसल्यामुळे पुतिन यांना शांतता चर्चेविषयी निर्णय घेण्यासाठी अप्रत्यक्षपणे वेळ देण्यात आला आहे. भारताने रशियाकडून तेल खरेदी थांबवण्याचे तसेच या वर्षाच्या अखेरीपर्यंत ही खरेदी शून्यावर आणण्याचे मान्य केल्याचा दावा ट्रम्प यांनी पुन्हा केला आहे. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी आपली चर्चा झाल्याचे त्यांनी बुधवारी व्हाइट हाऊसमध्ये पत्रकारांना सांगितले. भारत या दोन्ही रशियन तेल कंपन्यांकडून तेलखरेदी करतो. युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून भारत आणि चीन रशियन तेलाचे सर्वात मोठे ग्राहक बनले आहेत. या तेलखरेदीमुळे आपल्या जनतेवर जास्त आर्थिक ताण न येता त्यांची ऊर्जा गरज भागवता येईल अशी भारताची भूमका आहे. पूर्वी भारत खूप कमी रशियन तेल आयात करत असे. या काळात भारताने मध्यपूर्व आणि आफ्रिकेतील देशांमधून होणारी तेल आयात कमी केली. तेल आणि वायू हीच रशियाची सर्वात मोठी निर्यात असून याचे मुख्य खरेदीदार चीन, भारत आणि तुर्किये आहेत. त्यामुळे या निर्बंधांचा भारतालाही त्रास होऊ शकतो असे म्हटले जाते आहे. तर या निर्बंधांमुळे विकसनशील देशांची ऊर्जा सुरक्षितता धोक्यात येऊ शकते असा इशारा रशियाने दिला आहे. रशियाने युद्ध थांबवण्याचा प्रस्ताव फेटाळला असून रशियाची भूमिका बदललेली नाही हे स्पष्ट केले आहे. पूर्वेकडील भागातून युक्रेनचे सैन्य पूर्णपणे मागे जाण्याच्या मागणीवर रशिया ठाम आहे.**

# हरिहरेश्वर, दिवेआगर पर्यटन आणि श्रध्देचे माहेरघर


दक्षिण काशीचा अध्यात्मिक तेज आणि सुवर्ण गणेशाचा दिव्य आशीर्वाद

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुका हा कोकण किनारपट्टीवरील एक अद्वितीय भूभाग आहे – जिथे निसर्गाची शांतता, धार्मिक परंपरा, इतिहासाचा सुवास आणि समुद्राच्या लाटांतील सुरावटी एकत्र अनुभवता येतात. या तालुक्यातील हरिहरेश्वर आणि दिवेआगर ही दोन स्थळे आज महाराष्ट्राच्या पर्यटन नकाशावर तेजस्वी ताऱ्यांसारखी झळकत आहेत.

हरिहरेश्वर हे श्रीवर्धन तालुक्यातील अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र असून याला 'दक्षिण काशी' म्हणून ओळखले जाते. सावित्री व कृष्णा नद्यांच्या संगमाजवळ वसलेले हे स्थान, श्री शंकराच्या त्रिलिंग रूपाचे दर्शन देणारे एकमेव तीर्थस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. येथे शंकर, विष्णू आणि ब्रह्मा या त्रिदेवांची संयुक्त उपासना केली जाते – ही परंपरा अत्यंत दुर्मिळ आहे.

स्थानिक आख्यायिकेनुसार, प्राचीन काळात ब्रह्मदेव, विष्णू आणि महेश यांनी येथे यज्ञ केला होता. यज्ञात विघ्न आल्यामुळे शंकर 'कालभैरव' रूपात प्रकट झाले आणि या स्थळाचे पावित्र्य वाढले. म्हणूनच हरिहरेश्वर मंदिर परिसरात कालभैरव मंदिर, ब्रह्मा पॉईंट, गौतम तीर्थ, पांडव तीर्थ, महाशिव तीर्थ, अगस्तीगुहा अशी अनेक अध्यात्मिक स्थळे आहेत. श्रावण महिन्यातील सोमवार आणि शनिवार हे दिवस येथे विशेष उत्साहाने साजरे केले जातात. हजारो भाविक रुद्राभिषेक, दुग्धाभिषेक आणि विविध पूजा करून हर हर महादेवच्या घोषात तल्लीन होतात.

हरिहरेश्वर केवळ तीर्थस्थान नाही, तर निसर्गप्रेमींसाठीही स्वर्ग आहे. शांत समुद्रकिनारा, डोंगररांगा, घनदाट हरित पट्टा आणि निर्मळ हवा – या सर्वांनी या परिसराला ध्यानमय वातावरण लाभले आहे. जवळचा



हिम्मतगड किल्ला, सोमजाई मंदिर, आणि श्रीवर्धन बीच हे पर्यटकांना आकर्षित करणारे ठिकाणे आहेत.

**दिवेआगर–सुवर्णगणेश आणि पर्यटनाचे सुवर्णयुग**

१७ सप्टेंबर १९९७ रोजी संकष्ट चतुर्थीच्या दिवशी दिवेआगर येथील कै. द्रौपदीबाई पाटील यांच्या नारळ–सुपारी वाडीत झाडांना पाणी घालताना सुवर्ण गणेशाची मूर्ती सापडली. ती बातमी क्षणात महाराष्ट्रभर पसरली आणि श्रीवर्धन तालुक्याचे पर्यटन नशीब उजळले.

ही मूर्ती श्री गणपती मंदिरातील गणेशाच्या मुखवट्याची सुवर्ण प्रतिमा असल्याचे सांगितले जाते. सुवर्ण गणेश मंदिर हे आजही भाविकांसाठी खुले असून कोरोनानंतरही दर्शनासाठी सुव्यवस्थित व्यवस्था करण्यात आली आहे. भाविक येथे येऊन गणपती बाप्पा मोरया!च्या जयघोषात आपल्या मनोकामना व्यक्त करतात.

दिवेआगरचा समुद्रकिनारा स्वच्छता, सौंदर्य आणि शांततेसाठी प्रसिद्ध आहे. सोमजा देवी मंदिर, घुश्मेश्वर मंदिर, आणि जवळचा वेलास बीच (कासवांच्या प्रजननासाठी प्रसिद्ध) ही ठिकाणे प्रवाशांना वेगळा



अनुभव देतात.

हरिहरेश्वर–दिवेआगर परिसरात वाढत्या पर्यटकांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी मिळाली आहे. लॉकडाउन आणि चक्रीवादळानंतर नुकसानग्रस्त झालेल्या व्यावसायिकांना पुन्हा नवे बळ मिळत आहे. स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायत आणि मंदिर समितीकडून वाहनतळ, आरोग्यसेवा, पाणीपुरवठा आणि सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यात आल्या आहेत. स्वयंसेवक भाविकांना सतत मदत व मार्गदर्शन करतात.

दिवेआगरच्या रस्त्यांवरील नारळी पोफळीची झाडे, लाल मातीची कौलारू घरे, आणि किनाऱ्यावर झुलणाऱ्या निळ्याशार लाटा – हे दृश्य पर्यटकांना मोहून टाकते. संध्याकाळच्या वेळी आकाशात पसरलेला केशरी सूर्यास्त पाहताना प्रवासी क्षणभर थांबतात आणि मनात शांततेचा एक अद्भुत दरवळ पसरतो. हरिहरेश्वरच्या घाटावरून सूर्योदय पाहण्याचा आणि दिवेआगरच्या किनाऱ्यावरून सूर्यास्त अनुभवण्याचा आनंद शब्दांत सांगता येणार नाही.

पर्यटक येथे केवळ दर्शनासाठीच नाही, तर निसर्गाशी संवाद साधण्यासाठी येतात. स्थानिक कोकणी खाद्यपदार्थ, होमस्टे संस्कृती आणि ग्रामस्थांचा आत्मीय आदरभाव हे या पर्यटनाला मानवी स्पर्श देतात.

हरिहरेश्वर आणि दिवेआगर हे केवळ पर्यटनस्थळ नाहीत – ती श्रद्धा, इतिहास, संस्कृती आणि निसर्ग यांची एकात्म यात्रा आहेत. एका बाजूला दक्षिण काशीचे अध्यात्मिक तेज, तर दुसऱ्या बाजूला सुवर्ण गणेशाचा दिव्य आशीर्वाद – या दोन्हींच्या संगमाने श्रीवर्धन तालुका खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे धार्मिक आणि पर्यटन 'माहेरघर' बनला आहे.

श्री हरिहरेश्वर हे ब्रह्मा, विष्णू, महेश आणि पार्वती यांच्या सान्निध्याने पवित्र झालेले स्थान आहे. कालभैरवाच्या पश्चिमद्वारी महाबळ दैत्याचा पराभव येथेच झाला. ही भूमी यज्ञसंस्कृतीचा साक्षीदार असून येथे भक्तांना अपार आध्यात्मिक शांती लाभते. असे हरिहरेश्वरचे विश्वनाथ बोडस गुरुजी सांगतात

दिवेआगरचे संजय मांजरेकर म्हणतात दिवेआगर हे श्रीवर्धन तालुक्याचे सुवर्ण मुकुटमणी आहे. येथील सुवर्ण गणेश मंदिर, स्वच्छ आणि शांत समुद्रकिनारा, तसेच हिरव्या नारळी–पोफळीच्या बागा पर्यटकांना मोहून टाकतात. कोकणी संस्कृती, आदरातिथ्य आणि समुद्राची गार हवा प्रवाशांना पुन्हा पुन्हा येथे खेचते. बाणकोट किल्ला, सोमजा देवी मंदिर आणि वेलास बीच या ठिकाणांमुळे दिवेआगरला इतिहास, अध्यात्म आणि निसर्ग यांचा संगम लाभला आहे. संध्याकाळचा सुवर्ण सूर्यास्त आणि किनाऱ्यावरचे लाटांचे सूर प्रत्येक पर्यटकाच्या मनात अविस्मरणीय ठसा उमटवतात. दिवेआगर हे केवळ ठिकाण नाही – ती अनुभूती आहे, शांततेची आणि सौंदर्याची!

**–भारत चोगले,** श्रीवर्धन

# तत्वज्ञ, समाजसुधारक पांडुरंगशास्त्री आठवले

पांडुरंगशास्त्री आठवले हे तत्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९२० रोजी रोहे या कोकणातील गावी झाला. पारंपरिक शिक्षणाबरोबर सरस्वती संस्कृत पाठशाळेत संस्कृत व्याकरणाबरोबर न्याय, वेदांत, साहित्य, त्याचबरोबर इंग्लिश भाषा साहित्याचा अभ्यास त्यांनी केला. वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे यावर चिंतन केले.



१९५४मध्ये जपान येथे झालेल्या दुसऱ्या धार्मिक परिषदेत त्यांनी वेद आणि भगवद्गीतेवरील तत्त्वज्ञानावर भाषण केले. त्यानंतर त्यांना परदेशात स्थायिक होण्याच्या अनेक संधी आल्या, पण त्यांनी त्या नम्रपणे नाकारल्या. आपल्या क्रांतिकारी 'स्वाध्याय' चळवळीची सुरुवात त्यांनी १९५८मध्ये गुजरातमधील सौराष्ट्र विभागात केली. बघताबघता या चळवळीला एका खूप मोठ्या 'परिवारा'चे स्वरूप प्राप्त झाले. स्वाध्याय परिवाराने सहकारी तत्त्वावर शेती, मासेमारी आणि वृक्ष लागवड अशा अनेक योजना यशस्वीरीत्या राबविल्या.


सुरुवातीला काही गावांमध्ये सुरू झालेली चळवळ चार दशकांत अमेरिका, इंग्लंड, आफ्रिकेपर्यंत पसरली. व्यसनमुक्ती, सामाजिक जबाबदारीचे भान, पर्यावरणसंवर्धन आणि स्वकष्टाने आत्मसन्मान जागवून समानता निर्माण करण्याचा मंत्र या सूत्रांवर त्यांच्या स्वाध्याय चळवळीचा पाया उभा राहिला. अशा या द्रष्ट्या तत्वज्ञाचे २५ ऑक्टोबर २००३ रोजी निधन झाले.



## बदलते तंत्रज्ञान

### दिवाळीदरम्यान डिजिटल फ्रॉडपासून सावध राहा!

दिवाळीला अवघे काही दिवस उरले आहेत, तर या सणानिमित्त विविध कंपन्यांनी विविध सेलची घोषणासुद्धा केली आहे. एखादा सेल सुरू झाला की स्वस्तात मस्त वस्तू विकत घेण्याकडे आपल्या प्रत्येकाचे लक्ष असतं. पण, याचा फायदा अनेक हॅकर्ससुद्धा घेतात.



तुमचं एक चुकीचं पाऊल आणि तुमचं बँक अकाउंट रिकामं अशीसुद्धा परिस्थिती तुमच्यावर उद्भवू शकते. कारण सणासुदीच्या काळात खरेदीत मोठ्या संख्येने वाढ होते आणि स्वस्तात मस्त वस्तू खरेदी करण्याच्या नादात अनेक ग्राहक सुरक्षेकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे आर्थिक नुकसान आणि मनस्तापसुद्धा होऊ शकतो. म्हणूनच नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया म्हणजेच एनपीसीआयने ग्राहकांना सण–उत्सवाचा काळ अधिक सुरक्षितपणे आणि आनंदाने घालवण्यासाठी काही महत्त्वाचे सल्ले दिले आहेत.

✻ झटपट ऑफर आणि सूट आदी गोष्टींमुळे तुमच्याकडून जास्त प्रमाणात खरेदी केली जाऊ शकते. पटकन या ऑफर्स मिळविण्याच्या नादात अनेकदा तुमच्याकडून प्लॅटफॉर्मची विश्वासार्हता आहे का या गोष्टीकडे दुर्लक्ष होऊ शकते, त्यामुळे अनोळखी विक्रेते आणि संशयास्पद कंपन्यांची चांगली माहिती असणे आपल्यासाठी खूप महत्त्वाचे आहे.

✻ ऑफर्ससाठी साइन अप करताना, आवश्यक नसलेली वैयक्तिक माहितीची देवाणघेवाण करू नका, कारण यामुळे डेटा चोरी होण्याचा धोका वाढतो.

✻ खरेदीसाठी शॉपिंग मॉल्समधील ओपन वाय–फाय नेटवर्कचा वापर करू नका, त्यामुळे तुमची आर्थिक माहिती सहज हॅकर्सना मिळू शकते.

✻ सणासुदीच्या काळात खरेदीचे प्रमाण वाढत असल्यामुळे, आपण नक्की काय काय ऑर्डर केले आहे याची नोंद ठेवण्यात ग्राहकांकडून चुक होऊ शकते, यामुळे अनेक जण फिशिंग स्कॅम्सला बळी पडू शकतात. बनावट डिलिव्हरी नोटिफिकेशन्स टाळण्यासाठी पेमेंट लिंकवर क्लिक करण्यापूर्वी नेहमी दोनदा तपासून पाहा.


✻ तुमच्या खात्यांवर साधे किंवा डीफॉल्ट पासवर्ड वापरण्यापासून वाचा, कारण यामुळे तुम्ही हॅकर्ससाठी निशाण्यावर येऊ शकता. प्रत्येक खात्यासाठी स्ट्राँग आणि वेगळा पासवर्ड तयार करा, जेणेकरून तुमची सुरक्षा वाढेल.

# नटश्रेष्ठ चित्तरंजन कोल्हटकर

ज्येष्ठ अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांची जयंती १५ जानेवारीला झाली. कॅमेऱ्यासमोर आपण उभे राहिलो की, आपल्यासारखा दुसरा कलाकार कुणी नाही हा शांता आपटे यांचा गुरुमंत्र जपणारे चित्तरंजन कोल्हटकर हे सर्वार्थाने महान रंगकर्मी होते.

नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकर यांचे सुपुत्र चित्तरंजन कोल्हटकर यांनी वडिलांचा अभिनयाचा वारसा तितक्याच सामर्थ्याने मराठी रंगभूमीवर तब्बल ६० वर्षे चालवला. वडिलांच्या बलवंत संगीत नाटक मंडळीमुळे चित्तरंजन यांचे पाऊल रंगभूमीवर पडले तरी आपल्या मुलाने नाटकात यावे, असे चिंतामणराव यांना सुरुवातीला मुळीच वाटत नव्हते. मुलाने खूप शिक्षण घेऊन बॅरिस्टर व्हावे आणि राष्ट्रकार्य करावे, अशी त्यांची मनोमन इच्छा होती. राष्ट्रप्रेमापोटीच त्यांनी देशभक्त बॅरिस्टर चित्तरंजन दास यांच्या नावावरून आपल्या या मुलाचे नाव (चित्तरंजन) ठेवले होते. चित्तरंजनने बॅरिस्टर व्हावे ही चिंतामणरावांची इच्छा पूर्ण झाली नाही.

प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर चित्तरंजन कोल्हटकरांनी पोटापाण्यासाठी नोकरी शोधायला सुरुवात केली. मुंबईत ऑम्युनिशन फॅक्टरीत त्यांना नोकरी मिळालीही. परंतु तिथे त्यांच्यावर चोरीचा आळ घेतला गेल्याने स्वाभिमानी चित्तरंजन यांनी नोकरीसह मुंबईही सोडली. त्यांना सैन्यात भरती व्हायचे होते,




**निमित्त**

परंतु उंची आणि वजनात मार खाल्ल्याने तिथे त्यांची डाळ शिजली नाही. मुलाचे कुठेच काही जमत नाही पाहिल्यावर त्याला बेकार बसू देणे धोक्याचे आहे हे ओळखून चिंतामणरावांनी त्यांना आपल्या नाटक कंपनीत प्रॉम्प्टरचे काम मिळवून दिले.

नाटक कंपनीचे मालक असलेल्या दुसऱ्या कुणा बापाने मुलाला एखाद्या नाटकात मुख्य नट म्हणून उभे केले असते, परंतु चिंतामणरावांनी तसे केले नाही. त्यामुळे एक झाले. अनेक नाटकांत प्रॉम्प्टर म्हणून काम केल्याने आणि प्रॉम्प्टरला संबंध नाटकभर दक्ष राहावे लागत असल्याने चित्तरंजन यांना अनेक नाटके मुखोद्गत झाली. त्याच वेळी वडिलांच्या नाटकांच्या तालमींतून हजर राहिल्याने त्यांची नाटक बसवण्याची पद्धत, संवादफेकीचं तंत्र, रंगमंचीय व्यवहारांतील मेख, बड्या नटांच्या अभिनयातील खाचाखोचा यांचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष शिक्षण त्यांना मिळत गेले. तरीही चिंतामणरावांनी त्यांना नाटकात घेण्याचे मनावर घेतले नाही, परंतु एके दिवशी काही अडचणीमुळे 'भावबंधन'मधील बावळट मोरूचे काम करण्याची संधी चिंतामणरावांनी चिरंजीवांना दिली. त्या छोट्या कामात चित्तरंजनने हुकमी हशे वसूल करून वडिलांचा विश्वास सार्थ ठरवला. तेव्हापासून कंपनीच्या नाटकांतून चित्तरंजनना छोट्या–छोट्या भूमिका मिळू लागल्या, पण वसंत शिंदे, जयराम शिलेदार यांच्यासारखे बडे नट कंपनीत असेतोवर चित्तरंजनना कधीही मोठी भूमिका मिळाली नाही. विनोदी आणि गंभीर अशा दोन्ही भूमिका चित्तरंजन एव्हाना लीलया पेलू लागले होते. ते शेवटपर्यंत सक्रिय राहिले. या प्रवासात विष्णुदास भावे पुरस्कारासह अनेक मानसन्मान त्यांच्याकडे चालत आले. नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपदही त्यांना लाभले.

पुणे नाट्य परिषदेच्या स्थापनेत चित्तरंजन कोल्हटकर यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांना दीनानाथ मंगेशकर पुरस्काराने गौरवण्यात आले. त्यांना सिनेमांतील आणि नाटकांसाठी विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. रंगभूमीच्या भल्यासाठीच्या मागण्या घेऊन ते अनेक वेळा सरकार दरबारी जात. चित्तरंजन कोल्हटकर यांचे २५ ऑक्टोबर २००९ रोजी निधन झाले.

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### योग्य आहार घेतल्यावरही वाढतंय वजन? वाचा कारणे

आपण सुंदर, आकर्षक दिसावे अशी प्रत्येकाची इच्छा असते. पण सतत वजन वाढत असल्यामुळे आत्मविश्वास कमी होतो. शिवाय वजन वाढत असल्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. वजन जास्त असल्यास थोडं काम केलं तरी थकवा जाणवतो. चालताना किंवा पायऱ्या चढताना श्वास लागणे, स्नायू आणि सांधे दुखणे.. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, अयोग्य आहार हे वजन वाढण्यामागे कारण मानले जाते, ज्यामुळे शरीरात चरबी वाढू लागते.



सुस्त लाईफ स्टाइलमुळेदेखील वजन वाढू शकते. सुस्त लाईफ स्टाइल म्हणजे शारीरिक श्रम कमी करणे. एका जागी बसून ज्या लोकांचे काम असते. त्यांचे वजन लवकर वाढते. कायम ७–८ तास एकाच जागी काम केल्यामुळे शारीरिक हलचाल होत नाही. त्यामुळे रोज व्यायम करणं गरजेचं असतं. रोज सकाळी किंवा संध्याकाळ व्यायाम, जॉगिंग, चालणे इत्यादी करायला सुरुवात करा. याशिवाय ऑफिस किंवा घरात लिफ्टऐवजी जिने वापरा. दर १ तासाने किंवा दिवसातून ४० मिनिटांनी काही मिनिटांचा ब्रेक घ्या.

हार्मोनल असंतुलनामुळेदेखील वजन वाढू शकतं. थायरॉईडची लेव्हल असंतुलित असल्यास, मेटाबॉलिज्म मंदाऊ शकतो, ज्यामुळे वजन वाढू लागते. याशिवाय काही वेळा शरीरात इन्सुलिनचा योग्य वापर होत नसेल तर ही साखर फॅटमध्ये बदलते आणि शरीरात साठू लागते. याशिवाय इस्ट्रोजेन हार्मोनच्या असंतुलनामुळेही वजन वाढू शकते.

शारीरिक दृष्ट्या फिट राहण्यासाठी झोप फार गरजेची आहे. शारीरिला आरामाची गरज असते. योग्य झोप घेतल्यानंतर अनेक आजार दूर होतात. योग्य झोपे नसेल तर वजन वाढू शकते. जेव्हा तुम्हाला योग्य झोप मिळत नाही, तेव्हा हार्मोनल असंतुलन होऊ शकते आणि त्याचा तुमच्या दैनंदिन दिनचर्येवरही परिणाम होतो, ज्यामुळे मेटाबॉलिज्म मंदावण्यास सुरुवात होते आणि शरीराचे वजन वाढू शकते.

काही औषधांमुळे देखील वजन वाढू शकते. काही आजार असेल आणि तुम्ही औषधे घेत असाल तरी वजन वाढते. यावर डॉक्टरांचा सल्ला फार महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार योग्य आहार आणि झोप घ्या आणि स्वतःला फिट ठेवा. काही लोकांमध्ये वजन वाढण्याचे कारण अनुवांशिक असते, म्हणजेच आई–वडील किंवा कुटुंबात कोणी जाड असेल, वजन वाढू शकते. अशा लोकांनी खाण्या–पिण्यापासून ते रोजच्या व्यायामापर्यंत नेहमीच विशेष काळजी घ्यावी.

# खोरा बंदर होऊ शकते कोकणातील उत्तम पर्यटनस्थळ; विकासाची गरज



**मुरुड : रामप्रहर वृत्त**

मुरुड जंजिरा येथील खोरा बंदर परिसर कोकणातील सर्वात सुंदर ठिकाण आहे. एकदरा डोंगरापलीकडे समुद्राच्या कुशीत वसलेले समोर प्रसिद्ध जंजिरा किल्ला, उजव्या बाजूस शिवरायांनी बांधलेले पदामदुर्ग किल्ला व अगदी समोर दिघी प्रकल्प व डोंगरी गावच्या काळ्या दगडाच्या डोंगराखाली सुंदर पांढऱ्या वाळूत वसलेले खोरा बंदर पर्यटकांना अनेकवर्ष खूप आवडते, परंतु ह्या परिसरात खऱ्या अर्थाने विकास झालाच नाही.

नवीन जेट्टी प्रवाश्यांच्या सेवेवसाठी हे पहिले पाऊल आहे. कपारीत वसलेल्या काळकाई आईच्या मंदिराखाली किनारा पर्यटकांना बोटींसाठी अतिशय सुंदर आहे ,स्कुबा डायविंग साठी समुद्राचे पाणी निळेशार व नितळ आहे. खोरा बंदर ते राजपुरी समुद्रालगत दगडावरून रस्ता काढला तर जगातील सुंदर सनसेट पॉईंट होऊश कतो, कारण दोन जलदुर्गामधून सूर्यास्त होत असताना त्याचे प्रतिबिंब समुद्राच्या पाण्यात दिसते हे सुंदर रूप फक्त ह्यच किनारी पाहायला मिळते अशा खोरा बंदराची पार्किंग ५ वर्षांनी सुरु झाल्याने पर्यटक खुश आहे .परंतु सद्य कडक उन्हं असल्याने पर्यटकांना जेटीवर उभे राहने कठीण आहे सावलीसाठी पार्कींग परिसरात निवारा शेड बनवण्याची गरज आहे .पार्किंग परिसरात कॉंक्रिट रस्ता केला होता आज तो रस्ता पूर्णपणे खराब असून पायाला खडे लागतात अशी तक्रार पर्यटकांची आहे. सद्या पर्यटक सोलर पॅनल खालच्या शेडमध्ये सावलीसाठी आसरा घेत आहेत

जंजिरा किल्ल्यावर दरवर्षी राजपुरी व खोरा बंदरातील जेट्टीवरून सात लाखापेक्षा जास्त पर्यटक या किल्ल्यास भेट देत असतात.पर्यटकांच्या माध्यमातून प्रत्येक प्रवासी वर्गाच्या मागे ठराविक लेवी कर आकारला जाऊन त्याचे उत्पन्न महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डास मिळत असत.जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी नवीन जेट्टी व खोरा बंदरातून पर्यटकांना किल्ल्यापर्यंत पोहचवले जाते. या दोन्ही बंदरात तुफान गर्दी सुट्टीच्या हंगामात होत असते. त्यामुळे खोरा बंदरातील नवीन जेट्टी हि वरदायी ठरणार आहे.लांबी व रुंदी जास्त असल्याने या जेट्टीवर शेकडो पर्यटक अगदी सहज चढू व उतरू शकणार आहेत.ओहटी च्या वेळी नवीन जेट्टी खूपच आवश्यक ठरणार असून पर्यटकांचा खोळंबा होणार नाही.सध्या खोरा बंदरातील नवीन जेट्टीचे काम युद्धपातळीवर सुरु असल्याने मे अखेर पर्यंतच्या आत हे काम पूर्ण होणार असून असंख्य प्रवासी व पर्यटकांना याचा मोठा लाभ होणार आहे.

रायगडचे खासदार सुनिल तटकरे आणि आमदार महेंद्र दळवी यांनी पदमदुर्ग किल्ल्याला भेट दिली होती. त्यावेळी अधिकार्यांना मुरुडकरांच्या सांगण्यावरून खर बंदर ते एकदरा पुल्ला असा अर्धचंद्राकार समुद्रालगत रास्ता बनवण्याचा प्रस्ताव बनवण्याचे आदेश तटकरे यांनी दिले होते .त्याकामाला गती मिळाली तर परदेशी बीच मुरुडसमोर फिके पडतील व सागरी महामार्गावरील मुरुड व काशीद हे गोल्डन पॉईंट ठरतील .खोरा बंदरात पावसाळी लाटांचे तांडव सुरु असते .पावसाळी लाटांचा आनंदघेण्यासाठी खास पॉईंट बनवण्याची गरज आहे

जंजीरा किल्ल्यासाठी समोरच मोठी जेटी बनत आहे .पुढील काळात जंजिरा किल्ल्यात जाण्यासाठी सर्वात जवळचा मार्ग खोराबंदर असणार आहे ,म्हणूच येथील विकास गतिमान असणे गरजेचे आहे. येथील पार्कींग अजूनही मोठ्याप्रमाणात होण्याची गरज आहे. पूर्वी रस्ते वाहतूक नसताना ह्याच खोरा बंदरातून छोट्या बोटीतून मुंबई गोवा बोटीत जाण्याचा मार्ग होता त्या जुन्या आठवणी अजूनही ताज्या आहेत म्हणूच शासनाने खोराबंदर विकास करणे गरजेचे आहे

## माथेरानची वाहतूक कोंडी कधी फुटणार?



**माथेरान : प्रतिनिधी**

प्रत्येक सुट्ट्यांच्या हंगामात माथेरान घाटरस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना पर्यटकांना करावा लागत असल्याने माथेरान पर्यटनस्थळाला भेट द्यावी की नाही अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे पर्यटक बोलत आहेत.

मुळातच दस्तुरी नाक्यावर असलेली अपुरी पार्किंग व्यवस्था याला कारणीभूत असून या भागातील एमपी ९३ हा प्लॉट जोपर्यंत पार्किंग साठी नगरपरिषदेच्या ताब्यात मिळत नाही तोपर्यंत पर्यटकांना असाच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागण्याची शक्यता असून हा तिढा सुटणे अशक्यच असल्याचे बोलले जात आहे. जेमतेम दहा हजार पर्यटकांची क्षमता असलेल्या या ठिकाणी मुंबईकडील पर्यटक जवळचे पर्यटनस्थळ असल्यामुळे सुट्ट्यांच्या हंगामात मोठया प्रमाणावर गर्दी करत असतात. त्यामुळे पर्यटकांच्या वाहनांची गर्दी वाढल्यास दस्तुरी नाक्यावर पार्किंग साठी सद्यस्थितीत जागा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. मागील काळात यासाठी वनसमितीच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आले होते. परंतु त्यांनी केलेला प्रयत्न यशस्वी होऊ शकला नाही.

वाहतूक कोंडीचा तिढा कायमस्वरूपी संपुष्टात येण्यासाठी मानसिकता असल्यास सहज शक्य आहे, परंतु या स्थळाकडे नेहमीच दुर्लक्ष केले जात असल्याने ऐन सुट्ट्यांच्या हंगामात पर्यटकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

### मोराज एल-२, एल-३. टाईप सहकारी गृहनिर्माण संस्था ( मर्या.)

नोंदणी.क्र/आरजीडी/पीडब्ल्यूएल/ एचएसजी/(टिसी)/२२४६/२००९-२०१०/सन २००९ दिनांक : ०६/०५/०९

प्लॉट नं. ४४८,४४९/२, तक्का पनवेल, ता.पनवेल, जि. रायगड- ४१०२०६

जावक क्र. १३०-२०२५-२६ दिनांक :- २८/०९/२०२५

**जाहीर सूचना**

या नोटीसद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की. श्री शांताराम अहिलाजी पठारे, सदस्य मोराज एल-२, एल-३. टाईप को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., फ्लॅट क्र. २०३, एल-३ यांनी सोसायटीला कळविले आहे की, त्यांचा शेअर सर्टीफिकेट क्र. ३१, शेअर नं.१०६ ते ११० हरवले/गहाळ झाले असून त्यांनी सोसायटीकडे दुय्यम प्रत मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

तरी सदर दुय्यम शेअर सर्टीफिकेट देण्याबाबत काही हरकती असतील तर सदर हरकती ही नोटीस जाहीर झाल्यापासून १४ दिवसांच्या आत पुराव्यानिशी सोसायटीचे सचिव मोराज एल-२. एल-३, टाईप को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. पत्ता सोसायटी कार्यालय, प्लॉट नं.४४८. ४४९/२, मोराज रिव्हरसाईड पार्क, तक्का, पनवेल यांच्या कडे पाठवाव्यात. जर सदर मुदतीत कोणत्याही हरकती आल्या नाही तर सोसायटी बायलॉज नुसार दुय्यम शेअर सर्टीफिकेट इशू करेल याची नोंद घ्यावी. जर मुदतीत हरकती आल्या तर सोसायटी बायलॉजनुसार त्यावर निर्णय घेईल याची नोंद घ्यावी.

**सही/- अध्यक्ष** **सही/- सचिव** **सही/- खजिदार**

मोराज एल-२, एल-३. टाईप को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., करिता व तर्फे सचिव

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली शेती मिळकत त्या मिळकतसमोर लिहीलेल्या मालक/कब्जेदार कडुन आमचे अशिल विकत घेणार आहेत सदर मालक/कब्जेदार आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड खरेदीखत करणार आहेत. सदर शेती मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

मिळकतीचे वर्णन
**मौजे वाजापुर ता. पनवेल जि. रायगड.**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै |
|---|---|---|---|---|
| १) श्री. विनोद कृष्णा घरत<br>२) श्री. राजेंद्र कृष्णा घरत<br>३) श्री. महेंद्र कृष्णा घरत | २९ | २/अ | ०-५०-००<br>पैकी ०-३७-५०<br>(यांचे अविभाज्य हिश्यातील) | ५,०० |

वर नमूद केलेल्या शेती मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुलहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून २१ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर शेती मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक/कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व खरेदीखत रजिस्टर्ड करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण - पनवेल
दिनांक २५/१०/२०२५

**सही/-**
**श्री. पराग प्रफुल्ल म्हात्रे**

(ॲडव्होकेट हायकोर्ट व नोटरी) ११, केशव वसंत,
जुने तहसील कार्यालया समोर, पनवेल, ता. पनवेल जि. रायगड.

### सार्वजनिक सूचना / PUBLIC NOTICE

या सूचनेद्वारे सर्वसामान्यांना/सर्वांना कळविण्यात येते की श्री. प्रणव प्रकाश खोपकर व श्री. दत्तात्रय रामदास बिडवे रा. नवीमुंबई हे दिवंगत श्री. कृष्णा कथारी कटेकर रा. धुतूम ता. उरण जिल्हा रायगड यांचे कायदेशीर वारस व नमूद मालमत्ता विक्रेते श्री. समाधान कृष्णा कटेकर (मुलगा) व श्रीमती कुंदा वैजनाथ ठाकूर (कुंदा कृष्णा कटेकर (मुलगी) यांच्याकडून खालील मालमत्ता खरेदी करण्याच्या विचारात आहेत.

मालमत्तेचे तपशील:-

इरादा पत्र क्रमांक सिडको/भूमी/साटयो / द्रोणागिरी/२०७/२०२५/६१४६. दि. २६/०६/२०२५ अन्वये. सिडको नियोजित क्षेत्रातील प्लॉट क्र. २६८. सेक्टर-६५. द्रोणागिरी. ता. उरण, जि. रायगड. क्षेत्रफळ सुमारे २०० चौ. मी. मौजे शेमटीखार. सर्वे क्र. १८/१. क्षेत्र ०-२०-१८ (सदर मालमत्ता).

कोणत्याही व्यक्ती, संस्था किंवा प्राधिकरणास सदर मालमत्तेबाबत कोणताही दावा. हक्क. स्वारस्य किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी संबंधित पुराव्यांसह या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील क्रमांकावर व पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. निर्दिष्ट कालावधीत कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास. असे समजण्यात येईल की सदर मालमत्तेबाबत कोणताही दावा किंवा आक्षेप नाही आणि खरेदीदार व्यवहार पुढे नेतील. व त्यानंतर कोणतेही आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत.

खरेदीदार :-

श्री. प्रणव प्रकाश खोपकर श्री. दत्तात्रय रामदास बिडवे

विक्रेते:

दिवंगत श्री. कृष्ण कथारी कटेकर यांचे कायदेशीर वारस

श्री. समाधान कृष्ण कटेकर

श्रीमती कुंदा वैजनाथ ठाकूर

पत्ता :- ए विंग, कार्यालय क्र. १३०६ ते १३०९, शेल्टन सॅफायर, सेक्टर १५. सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४

(संपर्क: ९९२०६२६०३७/९२७१७७००८५)

**सही/-**
**संतोष आ. यादव**
**बी.एल.एस.एल.एल.बी.**
**वकील उच्च न्यायालय**

पत्ता :- १/१०१, राजकमल बेसाईड को. ऑप. हौ. सो., प्लॉट नं. २८, सेक्टर १५, सी.बी. डी. बेलापुर, नवी मुंबई - ४०० ६१४ दुरध्वनी : ०२२ ३५७२०३४८, मो : ९३२२२१३६९३

### जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक आनंदिबाई काशिनाथ घरत ऊर्फ आनंदिबाई कमलाकर घरत यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजेः विंधणे (५५३३२४)**
**(PU-ID: ३४६११११०६५१९), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २५५/१ | १ | १.८९.७०<br>पो.ख. ०.१०.४०<br>एकुण २.००.१० | २२.६९ |
| पैकी आनंदिबाई काशिनाथ घरत ऊर्फ आनंदिबाई कमलाकर घरत यांचे नावे असलेले खालील क्षेत्र | | | |
| खाते क. ६० | | ०.७३.७०<br>पो.ख. ०.१०.४०<br>एकुण ०.८४.१० | ८.८२ |
| आनंदिबाई काशिनाथ घरत ऊर्फ आनंदिबाई कमलाकर घरत यांच्या मालकीच्या असलेल्या एकुण क्षेत्र ०.८४.१० पैकी विक्रीस असलेले क्षेत्र ०.२४.०० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/१०/२०२५

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६ मो. क. ९९२०४७५८०१

## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
### ता. पनवेल, जि. रायगड
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

ऑक्टोबर २०२५

| अ.क्र | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रदिप बालासाहेब वरड/ सरोज प्रदिप वरड | जीवन गणपती पुरी | पवल१-६१४६-२०२५ | ०५ ऑगस्ट २०२५ | सदनिका क्र. १०, दुसरा मजला, बिल्डींग नं. जी ३, युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स, वसुंधरा को.ऑप.हौ.सो.लि. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| २ | दादाजी सिताराम वाघ/ निखिल दादाजी वाघ | समीर गंगाधर पाटील | पवल१-४८१७-२०२५ | २४ जुन २०२५ | सदनिका क्र. बी १०५, पहिला मजला, कपिश अपार्टमेंट, मंगलदीप को.ऑप.हौ.सो.लि. मौजे पालीदेवद. |
| ३ | पार्वती राजाराव पांगा/ संतोष राजाराव पांगा | मे. राम रत्न बिल्डर्स तर्फे भागीदार विनोद तुकाराम चांदे | पवल३-१६५६६-२०२२ | ३० सप्टे. २०२२ | सदनिका नं. १०१, पहिला मजला, सी विंग, श्री वसंत विहार को.ऑप.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ४ | गणेश चंदर माळी | चंदर एकनाथ माळी | पवल१-८७१२-२०२४ | २९ नोव्हे. २०२४ | रूम नं. ०४, तळ मजला, बिल्डींग नं. २, स्वागत को.ऑप.हौ.सो. मौजे पालीदेवद. |
| ५ | सुदेश बाळाराम गडगे/ प्रणाली सुदेश गडगे | किशोर रामचंद्र गायकवाड | पवल३-२५६१०-२०२४ | १८ डीसें. २०२४ | सदनिका नं. ए. ००२, तळ मजला, वरद विनायक, श्री वरद विनायक को. ऑप. हौ. सो. लि. मौजे शि. रायचूर. |
| ६ | सुचित प्रकाश राणे | सुप्रिया प्रकाश राणे/ वृषाली प्रकाश राणे/ शिल्पा सागर लाड | पवल४-१०८६६-२०२५ | १२ जुन २०२५ | सदनिका क्र.१३, बी-६, प्रेरणा सोसायटी, युगांतक कॉम्प्लेक्स, मौजे पालीदेवद. |
| ७ | प्रविण चंद्रकांत कावळे | महेंद्र रघुनाथ राणे | पवल१-२५-२०२५ | ०२ जाने. २०२५ | फ्लॅट नं. २०१, दुसरा मजला, बी विंग, फेज ३, ओम श्री कार्तिक्य गार्डन को. ऑप. हौ. सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ८ | सजी पौलोस/ पावलोस औसेफ पानेकडन | प्रवीण प्रभाकरन नायर | पवल३-४८७७-२०२५ | २८ फेब्रु. २०२५ | सदनिका क्र. १०२, डी विंग, पहिला मजला,गंगा धाम बिल्डींग नं. १ सी. एच. एस. ली., मौजे पालीदेवद. |
| ९ | गोविंदा प्रभाकर तिरमल/ गौरवी गोविंद तिरमल | सचिन बाळासाहेब पाटील | पवल१-६३०५-२०२५ | ०८ ऑग. २०२५ | रो हाऊस नं. १५, विघ्नहर्ता एन्क्लेव्ह को.ऑप.हौ.सो.लि. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १० | राजकुमार नारायण कडवे/ रश्मी राजकुमार कडवे | सचिन राजकुमार कडवे | पवल१-७१४५-२०२५ | ११ सप्टें. २०२५ | सदनिका क्र. १०३, पहिला मजला, ए विंग,निंबेश्वर पार्वती को.ऑप.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| ११ | मनोज भास्करन/ सारीका मनोज नाम्बियार | नारायण कृष्णा सुब्रमाणियम/ राजेश कुमार कृष्ण | पवल२-१९२५१-२०२५ | १९ सप्टें. २०२५ | रो हाऊस नं. ६, बिल्डींग क्र. १, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १२ | प्रशांत होताजी चितळकर/ प्रभा प्रशांत चितळकर | अकाला ग्रुप बिल्डर्स ॲण्ड डेव्हपर्स | नोटरी रजि. क्रमांक २४९० | १६ सप्टें. २०२५ | शॉप क्र. ००५, तळ मजला, स्वप्नपूर्ती को. ऑप. हौ. सो. लि. मौजे पालीदेवद. |
| १३ | सुरेश कोमल गुप्ता | अकाला ग्रुप बिल्डर्स ॲण्ड डेव्हपर्स | नोटरी रजि. क्रमांक ३५३४ | २२ सप्टें. २०२५ | शॉप क्र. ००८, तळ मजला, स्वप्नपूर्ती को. ऑप. हौ. सो. लि. मौजे पालीदेवद. |
| १४ | अरूण कुमार शरमानंद मौर्या | अकाला ग्रुप बिल्डर्स ॲण्ड डेव्हपर्स | नोटरी रजि. क्रमांक २५३३ | २२ सप्टें. २०२५ | ए ४, फ्लॅट नं. ४०८, चौथा मजला, निर्मल को. ऑप. हौ. सो. लि. मौजे पालीदेवद. |
| १५ | सुरेश कुमार यादव | अकाला ग्रुप बिल्डर्स ॲण्ड डेव्हपर्स | नोटरी रजि. क्रमांक २५३५ | २२ सप्टें. २०२५ | फ्लॅट नं.३११, तिसरा मजला, स्वप्नपूर्ती को. ऑप. हौ. सो.लि. मौजे पालीदेवद. |
| १६ | सुरेश कुमार यादव | अकाला ग्रुप बिल्डर्स ॲण्ड डेव्हपर्स | नोटरी रजि. क्रमांक २५३६ | २२ सप्टें. २०२५ | ए ५, फ्लॅट नं. ४०९, चौथा मजला, निर्मल को. ऑप. हौ. सो. लि. मौजे पालीदेवद. |
| १७ | निलीमा सत्यजित पाटील | निलीमा निलेश नाक्ती (नावात बदल करणे) | माहाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-२ | ऑगस्ट १४-२०, २०२५ | सदनिका क्र. ३०२ व ३०५, शुभारंभ बिल्डींग, मौजे पालीदेवद |
| १८ | मधुकर तानाजी देवडे | मे. उन्मेश हाऊस मेकर्स | पवल ५१६४-२००४ | १५ जुलै २००४ | सदनिका क्र. बी ०३, तळ मजला, गोकुळधाम कॉम्प्लेक्स, मौजे शिलोत्तर रायचूर |
| | निशा वाष्णेय | स्टेट बँक होम फायनान्स लि. तर्फे के. एस. बालदिया | पवल१- ०३९७०-२००८ | २० मे २००८ | |
| | आभा अगरवाल | निशा वाष्णेय | पवल३- ५७९६-२०१९ | ०४ एप्रिल २०१९ | |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(श्री. एन. जी. केणी)**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. ज्योती रविंद्र केणी)**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

# उत्सव काळात रात्रपाळीमध्ये विशेष स्वच्छता

## पनवेल महानगरपालिका क्षेत्रात मोहिमेचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी हा प्रकाशाचा आणि आनंदाचा सण असून, नागरिकांच्या आरोग्यदायी व स्वच्छ वातावरणात सण साजरा व्हावा यासाठी पनवेल महानगरपालिकेमार्फत विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.



महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या नेतृत्वाखाली दिवाळी उत्सव काळात संपूर्ण पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये रात्रपाळीमध्ये विशेष रस्ते सफाई आणि घनकचरा संकलन मोहीम हाती घेण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत नाइट शिफ्टमध्ये एकूण १०४ सफाई कर्मचारी नियुक्त करून दररोज ४१.८ किलोमीटर लांबीच्या प्रमुख रस्त्यांची सखोल सफाई करण्यात आली. या कर्मचाऱ्यांनी रात्रीच्या वेळी दिवसभर सणानिमित्त झालेल्या कचऱ्याचे त्वरित संकलन करून रस्ते स्वच्छ ठेवण्याचे मोलाचे कार्य केले.

सणाच्या काळात शहरात मोठ्या प्रमाणावर निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे त्वरित व्यवस्थापन करण्यासाठी या विशेष मोहिमेत ९ घंटागाड्या, ७ टिपर, १ JCB आणि १ हायड्रा या वाहनांचा वापर करण्यात आला. या सर्व वाहनांद्वारे दररोज सुमारे १४० टन कचऱ्याचे संकलन आणि विल्हेवाट लावण्यात आली. दिवाळीच्या काळात विशेषतः फटाके, सजावट साहित्य, फुलांची पाने, पूजनसाहित्य, पॅकिंग मटेरियल यांसारखा मोठ्या प्रमाणात निर्माण होणारा कचरा तातडीने गोळा करून शहरातील स्वच्छता अबाधित राखण्यात आली.

महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने सण काळात नागरिकांकडून निर्माण होणारा कचरा वर्गीकृत स्वरूपात देण्याचे आवाहन केले होते. नागरिकांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद देत ओला आणि सुका कचरा स्वतंत्रपणे देण्याचे भान राखल्यामुळे या मोहिमेला अधिक यश मिळाले.

स्वच्छ पनवेल, प्रगतिशील पनवेल या ध्येयाने कार्यरत असलेल्या महानगरपालिकेने या विशेष मोहिमेद्वारे दिवाळी सण काळात स्वच्छतेचा आदर्श निर्माण केला. शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा, सार्वजनिक ठिकाणे, वसाहती परिसर याठिकाणी रात्रपाळीमध्ये सातत्याने स्वच्छतेची कामे करण्यात आली.

पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी या मोहिमेत सहभागी विभागप्रमुख अनिल कोकरे, आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, जितेंद्र मढवी तसेच सर्व सफाई कर्मचारी, चालक, स्वच्छता निरीक्षक तसेच नागरिकांचे आभार मानले आहेत. दिवाळीच्या सणातही आपले दैनंदिन काम प्रामाणिकपणे पार पाडणाऱ्या या कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी पुढेही अशाच प्रकारे विशेष मोहिमा राबवून शहराच्या स्वच्छतेत सातत्य ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# आदई कातकरीवाडी येथील रहिवाशांची दिवाळी उत्साहात

## कपडे, दिवाळी फराळासह जातीच्या दाखल्यांचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी रायगड किशन जावळे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली आदई कातकरीवाडी तालुका पनवेल येथे उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक, नायब तहसीलदार संतोष पाटील, मंडळ अधिकारी गोवर्धन माने, तलाठी प्रिया वैती, महसूल सहाय्यक दीपक पाटील यांच्या हस्ते नवीन कपडे, दिवाळी फराळ आणि जातीचे दाखले वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून साकारण्यात आला.

संस्थेचे सचिव संतोष पवार, उपाध्यक्ष अ‍ॅड. राजेंद्र मढवी, रायगडभूषण दत्ता गोंधळी, सामाजिक कार्यकर्ते नामदेव ठाकूर हे उपस्थित होते. आदिवासी बांधवांची दिवाळी चांगल्या प्रकारे साजरी होण्यासाठी उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी स्वतःहून सर्व लहान मुलांना नवीन कपडे, सर्व कुटुंबांना दिवाळीचा फराळ यांचे वाटप केले.

उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून जातीचे दाखले तयार करण्यामध्ये तलाठी प्रिया वैती, तत्कालीन तलाठी शीतल सरगर, मंडळ अधिकारी गोवर्धन माने, आदिवासी विकास प्रकल्प अधीक्षक पनवेल, तहसीलदार पनवेल मीनल भामरे यांनी मोलाचे सहकार्य केले.

दिवाळी झाल्यावर आदिवासी लोकांच्या घरांसाठी असलेला घरठाण योजनेंतर्गत पनवेल तालुक्यातील सर्व आदिवासी लोकांच्या घरांचा प्रस्ताव तयार करून त्यांना सात बारावर अधिकृत नोंद करून देण्याची मोहीम राबविण्याचे आश्वासन दिले आहे. अ‍ॅड.राजेंद्र मढवी आदींनी आभार मानले.

# गोवठण्यात साकारली प्रतापगडाची प्रतिकृती

**उरण : बातमीदार**

दिवाळी सणानिमित्त गड किल्ले बांधण्याची कोकणात खूप जुनी परंपरा आहे. लहान बालके, मुले मुली आपल्या घरासमोर दिवाळी मध्ये विविध साहित्य वापरून गड किल्ले बांधत असतात. असाच एक प्रयत्न गोवठणे गावातील रुद्र म्हात्रे यांनी केला आहे. प्रतापगड किल्ल्याची प्रतिकृती बांधून त्यांनी भारतीय संस्कृती, महाराष्ट्राची संस्कृती जपली आहे. लहान मुलाने हा किल्ला बांधल्याने, सजावट केल्याने रुद्र म्हात्रे याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# लोक गौरव राष्ट्रीय एकात्मता परिषदेतर्फे राष्ट्रीय एकता सन्मान

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

लोक गौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद आणि एम.व्ही.एस यांच्या संयुक्त विद्यमाने ६व्या वर्धापन दिनानिमित्त साहित्य मंदिर, वाशी, येथे आयोजित करण्यात आलेला राष्ट्रीय एकता सन्मान महासोहळा नुकताच मोठ्या उत्साहात साजरा झाला.

एन.डी.खान यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या सदर पुरस्कार सोहळ्याच्या संयोजिका सलमा खान होत्या. लेफ्टंट कमांडर निलेश झोपे, महाराष्ट्राचे ख्यातनाम गझलकार ए.के.शेख, प्रसिद्ध अभिनेत्री आदिती सारंगधर, 'कस्टम व सेन्ट्रल एक्साईज'चे माजी आयुक्त सुधाकर पाटील, ज्येष्ठ समाजसेविका उषा दत्त, सहाय्यक पोलीस आयुक्त रामचंद्र



नागरगोजे, शिवाजीराव एस.जोंधळे विधी व संशोधन महाविद्यालय आसनगाव च्या प्राचार्या डॉ.पौर्णिमा सुर्वे, सिने दिग्दर्शक अल्ताफ शेख, अभिनेत्री उर्मिला डांगे आणि चित्रपट कलाकार केतकी गावडे आदी उपस्थित होते.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय व अनमोल कार्य करणाऱ्या सेवाव्रतींचा मान्यवरांच्या हस्ते 'राष्ट्रीय प्राऊड लिडरशिप आयकॉन पुरस्कार' व 'राज्यस्तरीय लोकसेवा गौरव पुरस्कार'आणि सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या वेळी गझल क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल ए.के.शेख सरांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी 'टी.एम. जी.क्रिएशन' व 'स्वरसंस्कार'संगीत विद्यालय प्रस्तुत हिंदी व मराठी गाण्यांचा सूर बालगंधर्व सुरेल मैफल या कार्यक्रमात स्वरसंस्काराच्या बाल कलाकारांनी सादर केले. पुरस्कारादरम्यान डॉ.विजय मोरे आणि विद्या डोंबे यांनी सुध्दा गीत सादर केले. त्याचप्रमाणे शब्दश्री विलास देवळेकर यांनी इकोच्या स्वरात सादर केले. सूत्रसंचालन पल्लवी वढवेकर – बर्वे आणि दीपक कदम यांनी केले. तर निवेदन देवश्री घोडके आणि स्वरा घरत यांनी केले.

सोहळा यशस्वी करण्यासाठी राजकुमार ताकमोगे, फिरोज पटेल, श्रेयशी गोंडाबे, मीना ताकमोगे, स्नेहा चांदोरकर, डॉ.ईसा शेख, विजय भोसले, प्रतिभा किर्ती कर्वे, नंदिनी सुकाळे, डॉ.शेलेंद्र पवार, डॉ.विजय मोरे, गुलाब सलाट यांनी परिश्रम घेतले.

# उरणमध्ये शिवसेनेतर्फे दिवाळी फराळ कार्यक्रम

**उरण : बातमीदार**

उरण विधानसभा मतदार संघात शिवसेनेच्या वतीने अनेक विविध उपक्रम राबविले जातात. शिवसेनेचे उरण विधानसभेचे जिल्हाध्यक्ष अतुल भगत यांच्या मार्गदर्शनानुसार अनेक लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात आले.

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पदाधिकारी कार्यकर्त्यांची दिवाळी गोड व्हावी, एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होता यावे, दिवाळी सणाचा सर्वांना एकत्रितपणे लुटता यावा या अनुषंगाने शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अतुल भगत यांनी कामठा रोड उरण शहर येथील शिवसेनेच्या पक्ष कार्यालयात दिवाळी फराळच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.




या कार्यक्रमात उरण विधानसभा मतदार संघातील शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. या वेळी जिल्हाध्यक्ष अतुल भगत, उरण तालुका प्रमुख दिपक ठाकूर, उरण विधानसभा संपर्क प्रमुख रमेश म्हात्रे, उरण विधानसभा सचिव हितेश नाईक, उप तालुका प्रमुख अमित ठाकूर, पनवेल उप तालुका प्रमुख गौरव गायकवाड, उरण शहर प्रमुख सुलेमान शेख, वाहतूक सेनेचे पदाधिकारी दशरथ चव्हाण, करंजाडे शहर संघटक –स्वप्नील मोरे, वडघर शहर प्रमुख समाधान परदेशी, वडघर विभाग प्रमुख रवि पाटील आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमावेळी वडघर विभाग, वडघर शहर, चिरनेर विभागातील अनेक वेगवेगळ्या पक्षातील कार्यकर्त्यांनी मोठया संख्येने शिवसेना पक्षात पक्ष प्रवेश केला. या वेळी विविध कार्यकर्त्यांची वेगवेगळ्या पदावर नियुक्ती करण्यात आली. अधिकृतपणे नियुक्तीचे पत्रही यावेळी देण्यात आले.

# रेडीमेड गोंडा फुलाच्या हाराला मागणी वाढली

**उरण : वार्ताहर**

दिवाळी सण निमित्ताने गोंडा फुलांना महत्त्व फार असते. उरण बाजार पेठेतील राजपाल नाका येथे रेडीमेड गोंडा फुलांचे हार विकावयास आले आहेत.

संपूर्ण उरण बाजार पेठेत ठीक–ठिकाणी गोंडा फुले ८० रुपये किलो या दराने मिळणारा गोंडा आज १०० ते १२० दराने उरण बाजारात मिळू लागला आहे. नागरिक गोंडा खरेदी करतांना दिसत आहेत. रेडीमेड गोंडा फुलाचे हार १०० ते १५० रपये या दराने आम्ही विकतो असे अलिबाग कावाडे येथील रोशनी रवींद्र म्हात्रे व ऋतुजा पाटील (नवखार) यांनी सांगितले.



# उरण येथे मोफत वैद्यकीय शिबिर

**उरण : वार्ताहर**

भारतीय नौदलाच्या नेव्ही वीक सेलिब्रेशन २०२५ चा एक भाग म्हणून, INHS संधानी आणि



नेव्हल स्टेशन कारंजा हे उरण आणि आसपासच्या गावातील रहिवाशांना मोफत आरोग्य सेवा आणि सल्ला देण्यासाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करत आहेत. हे शिबीर सोमवारी (दि.२७) सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत उरण एज्युकेशन सोसायटी इंग्लिश स्कूल, पालक मैदान येथे होणार आहे.

या शिबिरात वैद्यकीय तज्ञ, दंतवैद्य,शल्यचिकित्सक, स्त्रीरोग तज्ञ, बालरोगतज्ञ, ENT विशेषज्ञ, नेत्ररोग तज्ञ आणि त्वचारोग व् विविध वयोगटातील आरोग्यविषयक सल्ला देण्यात येईल. तज्ञांच्या सल्ल्या व्यतिरिक्त, औषधे आणि रक्त तपासणी यासह आवश्यक मोफत सेवा प्रदान केल्या जातील.

# खारघरमध्ये नवीन कॅन्सर केअर इमारत



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कर्करोगावरील उपचार, संशोधन आणि शिक्षणासाठी खारघर नवी मुंबईतील टीएमसीच्या प्रगत केंद्रात नवीन कॅन्सर केअर इमारतीचे बांधकाम सुरू करण्याची घोषणा आयसीआयसीआय बँक आणि टाटा मेमोरियल सेंटरने केली.

महाराष्ट्रातील नवी मुंबई, पंजाबमधील मुल्लानपूर (नवीन चंदीगड) आणि आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे प्रत्येकी एक अशा तीन अत्याधुनिक कॅन्सर केअर इमारतींच्या उभारणीसाठी बँकेने टीएमसीला १,८०० कोटी देण्याचे आश्वासन दिले असून, हे केंद्र हा त्याचाच एक भाग आहे.

'आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीचे भूमीपूजन तसेच पायाभरणीचा समारंभ करण्यात आला. आयसीआयसीआय बँकेचे अध्यक्ष प्रदीप कुमार सिन्हा, संदीप बत्रा, कार्यकारी संचालक, आयसीआयसीआय बँक; अजय गुप्ता, कार्यकारी संचालक, आयसीआयसीआय बँक आणि डॉ. सुदीप गुप्ता, संचालक, टीएमसी हे या वेळी उपस्थित होते.

# दिवाळीत मिठाईऐवजी व्यक्तिगत भेटवस्तूंना नागरिकांची पसंती

**पनवेल : वार्ताहर**

दिवाळी हा सण केवळ प्रकाशाचाच नव्हे तर आनंद, आपुलकी आणि भेटींगाठीचा सण म्हणून ओळखला जातो. या काळात आपल्या भाऊ–बहीण, नातेवाईक, मित्र परिवाराला मिठाई किंवा भेटवस्तू देऊन आपले प्रेम, स्नेह आणि शुभेच्छा व्यक्त करण्याची परंपरा आहे, मात्र गेल्या काही वर्षांपासून आपल्या प्रियजनांना भेटवस्तू देण्याचा ट्रेंड काहीसा बदलताना दिसतो आहे. या दिवाळीत त्या परंपरेला आधुनिक वळण मिळाले असून पारंपरिक मिठाईऐवजी व्यक्तिगत भेटवस्तूंना अधिक पसंती मिळताना दिसत आहे.



नागरिकांमध्ये वाढत चाललेली आरोग्याबाबतची जागरूकता, एखाद्या व्यक्तीसाठी खास भेटवस्तू देणे यामुळे ग्राहकांचा खरेदीचा कल बदलताना दिसत आहे. पनवेल परिसरातील गिफ्ट व सुकामेवा विक्रेते, बुटीक गिफ्ट शॉप्स इत्यादी दुकानांमध्ये सध्या ग्राहकांची वर्दळ आहे. यंदा मिठाईपेक्षा चॉकलेट्स, सुकामेवा, अरोमा कैंडल्स, गेल्या काही काळापासून नागरिकांमध्ये आरोग्याप्रति वाढलेल्या जागरूकतेमुळे साखर खाण्याचे प्रमाण घटले आहे. त्यामुळे साखरयुक्त मिठाईऐवजी साखर विरहित शुगर–फ्री मिठाईला नागरिक पसंती देत आहेत. त्याशिवाय सुकामेवा, खजूर, ड्रायफ्रूट बॉल्स आणि शुगर–फ्री चॉकलेट्सच्या मागणीतही लक्षणीय वाढ झाली आहे.

दिवाळीच्या भेटवस्तूंसाठी ऑनलाईन व्यासपीठावर वेगळीच धूम असून, ई–कॉमर्स संकेतस्थळांवर 'पर्सनलाइज्ड गिफ्ट बॉक्स', 'कॉर्पोरेट दिवाळी कलेक्शन' आणि 'हेल्दी हॅम्पर्स' यांचे विविध पर्याय उपलब्ध झाले आहेत. यासोबतच स्थानिक स्टार्टअप्सकडून घरपोच सेवाही सुरू असून, या नव्या ट्रेंडमुळे लहान उद्योगांनाही प्रोत्साहन मिळत आहे.

# दिवाळीनिमित्त जांभिवली घेरावाडीत भाजपतर्फे साडीवाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जांभीवली ग्रामपंचायत मधील घेरा वाडी येथे भारतीय जनता पार्टीतर्फे दिवाळीनिमित्त साडी वाटप कार्यक्रम करून दिवाळी साजरी करण्यात आली.

दिवाळी निमित्त कार्यक्रम राबवत असताना त्यांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या तसेच विविध विकास कामे या वाडीमध्ये आमदार महेश बालदी यांच्या आशीर्वादाने करण्यात आली. त्याच प्रकारे भविष्यातही अशीच विकास कामे होऊन विविध समस्या सोडविण्यासाठी भारतीय जनता पक्ष कटिबद्ध असणार असा निर्धार या वेळी करण्यात आला.

या वेळी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, ज्येष्ठ कार्यकर्ते धर्मा कोंडीलकर, कृष्णा कोंडीलकर, आपटा पंचायत समिती युवा अध्यक्ष कल्पेश कोंडीलकर, जयंता कोंडीलकर, ग्रामपंचायत सदस्य हरेश वाघ, दत्ता निरगुडे, परशू वाघ, नवनाथ वाघ, नागेश वाघ, संजय कोंडीलकर, केलवणे विभागीय उपाध्यक्ष, अनंता पाटील, काशिनाथ गोडीवले, काशिनाथ निकम, भानुदास माळी, जयेश कोंडीलकर, अल्पेश ठाकूर, रोशन कोंडीलक, गौरव कोंडीलकर, तुषार कोंडीलकर आदी उपस्थित होते.



# पर्ण दिवाळी अंकाचे प्रकाशन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्ण दिवाळी अंक २०२५चे प्रकाशन ठाणे येथे नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद मराठे यांच्या हस्ते, तर पुणे येथे मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

पर्ण दिवाळी अंकाने समाविष्ट केलेल्या बालपणातून घडलो–'बि'घडलो या विषयाचे कौतुक करून या पुढच्या काळात सामूहिक वाचनाची गरज प्रत्येक घरात असल्याचे मत मिलिंद मराठे यांनी व्यक्त केले. मुलांनी वाचावे याकरिता अशा प्रकारचे प्रयोग आपण करणार आहोत, अशी माहितीही त्यांनी दिली. या वेळी संपादक अपर्णा कुलकर्णी–नाडगौडी, जाहिरात व्यवस्थापक सुधीर नाडगौडी उपस्थित होते.

पर्ण दिवाळी अंक २०२५चे प्रकाशन नुकतेच पुणे येथे मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले यांचे हस्ते करण्यात आले. या वेळी कार्यकारी निर्माते संजय ठुबे, लेखक आणि ज्येष्ठ पत्रकार राज काझी, 'पर्ण'चे कार्यकारी संपादक प्रशांत कुलकर्णी, कार्यकारी निर्माते प्रवीण वानखेडे, अक्षय पंडित आणि अनिल गुंजाळ या मान्यवरांच्या उपस्थितीत पर्णचे प्रकाशन करण्यात आले.

कुटुंब व्यवस्था–सशक्त समाजाची ताकद या विषयावरील पर्ण दिवाळी अंक नक्कीच उल्लेखनीय ठरेल, असे मत या वेळी मेघराज भोसले यांनी व्यक्त केले.

# कोपरी मार्गालगतच्या झाडांची कत्तल

**श्रीवर्धन : बातमीदार**

कोपरी मार्गाच्या काँक्रीट रस्त्याच्या बाजूला असलेल्या काही जागा मालकांनी आपल्या जागेतील विविध मोठे वृक्ष, नारळ, सुपारीची रोपे सर्व एका रात्रीत कत्तल करून त्या ठिकाणी सपाट मैदान तयार केले आहे.



श्रीवर्धन शहरातील पेशवे आळी ते बाजारपेठ असा जोडणारा पूर्वी कोपरी मार्ग होता. या मार्गावरून पावसाळी पाणी वाहत असे. त्यामुळे पावसाळ्यात या मार्गाला नाल्याचे स्वरूप येत असे, परंतु पावसाळा संपल्यानंतर त्या ठिकाणाहून सायकल. बैलगाडी तसेच पादचारी यांचा बाजारात जाण्याचा जवळचा मार्ग म्हणून वापर होत होता, परंतु चार ते पाच वर्षांपूर्वी श्रीवर्धन नगर परिषदेने या नाल्यावरती पूर्णपणे काँक्रीट टाकून काँक्रीटचा रस्ता तयार केला. काँक्रिट रस्ता तयार केल्यानंतर त्याच्यावरती पथदिवेदेखील बसविण्यात आले आहेत.

सदर मार्ग तयार झाल्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील जागामालकांना रान मोकळे मिळाले. अनेकांनी या काँक्रीट मार्गाच्या बाजूला आपली अनधिकृत बांधकामे उभी करून दुकान काळे बांधून भाड्याने दिले आहेत, मात्र श्रीवर्धन नगर परिषदे कडून अद्यापही सदरचे दुकान गाळे अधिकृत आहेत, अनधिकृत आहेत, परवानगी घेऊन बांधलेले आहेत. याबाबत कोणताही खुलासा करण्यात येत नाही. तसेच या काँक्रीटने बांधलेल्या मार्गावरती नव्याने रिक्षा स्टॅन्ड व पार्किंग देखील तयार झाले आहे.

आता तर या कोपरी मार्गाच्या काँक्रीट रस्त्याच्या बाजूला असलेल्या काही जागा मालकांनी आपल्या जागेतील विविध मोठे वृक्ष, नारळ, सुपारीची रोपे सर्व एका रात्रीत कत्तल करून त्या ठिकाणी सपाट मैदान तयार केले आहे. दिवाळीनिमित्त लागोपाठ आलेल्या सुट्ट्यांचा फायदा घेऊन सदरचे काम करण्यात आल्याचे बोलले जात आहे. काही दिवसानंतर त्या ठिकाणीदेखील मोठ्या प्रमाणावरती इमारती उभ्या राहतील व निसर्गरम्य असलेल्या श्रीवर्धन शहराला वाळवंटाचे स्वरूप प्राप्त व्हायला वेळ लागणार नाही. शहरात वाळवंट तयार झाल्यानंतर प्रवासदेखील उंटावरूनच करावा लागेल.

कारण कोपरी मार्ग हा अत्यंत अरुंद मार्ग आहे. यावरून सायकल, दुचाकी किंवा पादचारी यांनाच जाता येईल एवढा रस्ता आहे. परंतु अनेक चार चाकी वाहन चालक देखील या रस्त्यावरून जाण्याचा प्रयत्न करत असतात. सदर झाडांच्या कत्तली बाबत माहिती घेतली असता श्रीवर्धन नगरपरिषदेकडून कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात आलेली नाही.श्रीवर्धन भूमिअभिलेख कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यां कडून पैसे घेऊन सुट्टीच्या दिवशी सुध्दा जागा मोजणी करुन देण्यात येते. तसेच त्या जागेवरती सुट्ट्यांच्या दिवशी भूमी अभिलेख विभागाकडून जागा मोजणी करून हद्दी कायम करण्यात येतात.

या खाजगी जागा मोजणी मध्ये पांढरी रेषा तयार करून सिमेंटचे पोल देखील उभे करण्याचे काम सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे.

### गुन्हा दाखल करण्याची मागणी

***श्रीवर्धन नगर परिषद प्रशासनाने संबंधित जागा मालकांवरती झाडांची कत्तल केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करावा. तसेच त्या ठिकाणी कोणी विकासक बांधकाम व्यावसायिक इमारती उभ्या करण्यासाठी परवानगी मागत असल्यास देऊ नये, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.***

# खालापूर टोलनाक्याला कारची जोरदार धडक

### *कर्मचाऱ्यांसह कारमधील पाच प्रवासी जखमी*

**खोपोली, मोहोपाडा, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरून पुण्याहून मुंबईकडे कार जात असताना चालकाला झोप लागल्याने कारने समोरील खालापूर टोल नाक्याच्या सुरक्षा कठड्याला आणि कर्मचाऱ्याला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला या अपघातात कर्मचाऱ्यांसह कार मधील दोन प्रवाशी जखमी झाले आहेत.

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरून कार क्रमांक (MH ०६ BM ४९४२) हा चालक तुळशीराम बाबाजी शिंदे (वय ४५, रा.साईनगर कळंबोली) पुण्याहून मुंबईकडे जात असताना तो खालापूर टोलनाक्यावर आला असता चालकाला झोप लागल्याने कारने समोरील खालापूर टोल नाक्यावरील सुरक्षा कठड्याला जोरदार धडक दिली.

यात खालापूर टोल नाक्यावर



कार्यरत असलेल्या कर्मचारी (मछिंद्र गोपीनाथ पाटील, वय ४२) कारमधील सुमन बाबाजी शिंदे (वय ७०) बाबाजी शामराव शिंदे (वय ७५) हे तीन जण जखमी झाले असून त्यातील सुमन शिंदे ह्या गंभीर जखमी झाली आहे

या अपघाताची माहिती मिळताच देवदूत यंत्रणा, आयआरबी पेट्रोलिंग, महामार्ग वाहतूक पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा बचलचे जवान, हेल्प फाउंडेशनचे सदस्य, आदी तत्काळ घटनास्थळी दाखल होत कार मधील जखमीना बाहेर काढून एमजिएम रुग्णालय पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले पुढील तपास सुरू आहे.

# भाजपतर्फे वांगणी ग्रामस्थांची दिवाळी गोड



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील वांगणी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विद्यमान सदस्य तथा भाजपचे रोहा तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर हे गेले सहा वर्षांपासून वांगणी गावातील ग्रामस्थांना ४०० किलो साखर वाटप करून ग्रामस्थांची दिवाळी गोड करत आलेले आहेत.

यावर्षीदेखील एकनाथ ठाकूर यांनी आपली परंपरा अबाधित ठेवली असून दिवाळी निमित्त सोमवारी (दि. २०) सायंकाळी एकनाथ ठाकूर यांनी आपल्या कार्यकर्त्यांच्या मदतीने वागणी गावात घरटी दोन किलो साखर वाटप केले. एकनाथ ठाकूर राबवित असलेल्या या गोड परंपरेचे सर्व स्थरातून कौतुक होत आहे.

वांगणी गावात घरो घरी जाऊन साखर वाटप करताना एकनाथ ठाकूर यांच्या समवेत त्यांचे कार्यकर्ते भरत यादव, प्रवीण कदम, सुरेश तेलंगे, प्रकाश ठाकूर, रोहिदास ठाकूर, निलेश यादव, अशोक ठाकूर, जय गोळे, शुभम तेलंगे जितेंद्र दळवी, सखाराम ठाकूर, संभव ठाकूर, अरुणा ठाकूर, शरयू ठाकूर, रितिका पोलेकर ओवी पिंगळे, गावच्या पोलीस पाटील अदिती एकनाथ ठाकूर यांच्यासह काही महिलांनी सहभाग घेतला होता.

# आदिवासी बांधवांना मिठाई वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील ऊसरोली ग्रामपंचायत हद्दीमधील वालवटी, बेलीवाडी, वडघर, मणेर येथील आदिवासी बांधवांना दीपावली निमित्ताने मनीष नांदगावकर मित्रमंडळाकडून मोठ्या प्रमाणात मिठाई वाटप करण्यात आले.

दीपावली सर्वच जण साजरे करीत असतात, परंतु गोर गरीब आदिवासी लोकांना आर्थिक चनचण मुळे दीपावली सण साजरा करता येत नाही. मेहनत करून आदिवासी समाज आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असतो. अशा गोर गरीब लोकांना दीपावली साजरी करता यावी यासाठी माजी सरपंच मनीष नांदगावकर यांनी विशेष पुढाकार घेऊन येथील गरीब आदिवासी बांधवांना मिठाई व दीपावली फराळ वाटप करण्यात आले.

या वेळी माजी सरपंच मनीष नांदगावकर यांच्या समवेत उपसरपंच महेश पाटील, रईस घलटे, राजश्री नांदगावकर, रमेश गुंड वीरेंद जाधव आदी उपस्थित होते.



# नागोठण्यात पोलीस स्मृतिदिन साजरा



**नागोठणे : बातमीदार**

पोलीस स्मृतिदिनानिमित्त मंगळवारी नागोठणे पोलीस स्टेशन येथे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी, पोलिस उपनिरीक्षक गोटीराम पावरा, ठाणे अमलदार सहा.फौजदार रमेश सोनकर, गोपनीय अमलदार पोलीस हवालदार अथर्व पाटील यांच्यासह इतर १० अमलदार यांच्या उपस्थितीत सेवा केंद्र सोशल सेंटर नागोठणे यांच्या वतीने रा.जि.प शाळा चिकणी, पाटणसई, घोगरकरवाडी, वासगाव, लाव्याची वाडी, कार्ली या शाळेतील विध्यार्थ्यांची कार्यशाळा व स्पर्धा घेण्यात आली.

या कार्यक्रमात ७० ते ८० विद्यार्थी व पाच शिक्षक यांनी सहभाग घेतला होता. या वेळी सागरी सुरक्षा संदेश, सायबर क्राईम, गुड टच बॅट टच अल्पवयीन विवाह व पोलीस ठाणे कार्यप्रणाली याबाबत विध्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

नागोठणे परिसरात जनजागृती व्हावी याकरिता नागोठणे पोलीस स्टेशन पासून बाजारपेठ, कोळीवाडा, खुमाचा नाका, जोगेश्वरी मंदिर, अंगार आळी, खडक आळी मार्गे पुन्हा पोलीस स्टेशन अशी विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली आहे.

# बेणसे सिद्धार्थ नगरात समाजरत्नांचा सत्कार



**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील बेणसे सिध्दार्थ नगर येथील नालंदा बुद्धविहारात नुकतेच रमाई महिला मंडळ यांच्या वतीने अतिशय नियोजनबद्ध व सर्वांगसुंदर अशा सत्कार समारोह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी राज्यस्थरावरील समाजरत्न पुरस्कार मिळल्याबद्दल चंद्रकांत अडसुळे, शेखर भगत यांना तर राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल पत्रकार धम्मशील सावंत यांना शाल, पुष्पगुच्छ व लेखणी भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी गुणवंत विद्यार्थी, तसेच आंबेडकरी व धम्म चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्यांचादेखील सत्कार करण्यात आला. या वेळी आदित्य भगत यांनीदेखील समाजरत्नांचा भेटवस्तू देऊन सत्कार केला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आरती दीपक भगत यांनी भूषविले. तर प्रास्ताविक मंडळाच्या अध्यक्षा ममता शेखर भगत, सूत्रसंचालन सोनाली अनिल शिंदे, पूजा अमित अडसुळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमाई महिला मंडळ बेणसे सिध्दार्थ नगरच्या सर्व पदाधिकारी, सभासद यांनी मेहनत घेतली.

# मुकेश भोस्तेकर यांचा सत्कार

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील उणेगाव, रायगड जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल रायगड जिल्हा परिषद उत्कृष्ट शाळा, उणेगावच्या शाळा व्यवस्थापन समितीने मुकेश भोस्तेकर सरांचा सत्कार केला.

शिक्षण क्षेत्रात केलेल्या त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन मुकेश भोस्तेकर यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन आणि खारभूमी विकास कॅबिनेट मंत्री आदरणीय भरतशेट गोगावले, महिला व बालकल्याण विकास कॅबिनेट मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी बडे, शिक्षणाधिकारी दहितुले मॅडम, उपशिक्षणाधिकारी शेडगे आणि गटशिक्षणाधिकारी तांबट मॅडम यांच्या उपस्थितीत मिळाला आहे.





**मुरूड : रायगड जिल्हा परिषद सदस्य व शिवसेनेच्या नेत्या मानसी महेंद्र दळवी यांना शिवसेना बांधकाम कामगार सेना अध्यक्ष दिनेश मिनमिने, उपजिल्हा युवासेना उपजिल्हाप्रमुख दीपेश वरणकर, मुरूड तालुका संघटक यशवंत पाटील, युवासेना उपतालुकाप्रमुख निलेश तांबटकर, चिटणीस अविनाश शिंदे आदींनी दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.**

# माथेरानमध्ये सापाला जीवदान

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील पंचवटी नगर विभागातील नागरी वस्ती मध्ये घोणस जातीचा विषारी साप निदर्शनास आला असता त्याला माथेरान निसर्ग मित्र संस्थेचे सर्प मित्र अनिकेत मोरे यांनी अगदी शिताफीने पकडून या घोणस जातीच्या विषारी सापाचा जीवदान देऊन त्याला त्याच्या मुख्य अधिवासात सोडून दिले.

माथेरानच्या डोंगरमाथ्यावर घनदाट जंगल असून अनेक सरपटणारे प्राणी येथे निदर्शनास पडतात. यामध्ये प्रामुख्याने साप जास्त प्रमाणात आढळतात.

माथेरान पंचवटी नगर भागातील लोकवस्ती मध्ये दि.२० रोजी रात्री उशिरा एक भला मोठा साप एका घराच्या अंगणात फिरताना दिसला. या वेळी शेजारी राहत असलेल्या रहिवाशांनी माथेरानमध्ये कार्यरत असलेल्या निसर्ग मित्र संस्थेचे सदस्य तथा सर्पमित्र अनिकेत मोरे यांना दूरध्वनी द्वारे कळविले. क्षणाचाही विलंब न करता रात्रीच्या वेळी अनिकेत मोरे हे त्या ठिकणी हजर झाले. भला मोठा घोणस जातीच्या विषारी साप पाहून ते देखील थक्क झाले, मात्र अगदी शिताफीने त्यांनी त्या सापाला पकडून रिस्क्यू केले.

# मेंढपाळांचा कळप चाऱ्यासाठी रायगड जिल्ह्यात दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाळा संपताच घाटमाथ्यावरून मेंढपाळ कळपासह रायगड जिल्ह्यामध्ये दाखल झाले आहेत. पुढील सहा ते सात महिने चाऱ्यासाठी पायपीट सुरू राहणार आहे. मुंबई-पुणे महामार्गावर असाच एक कळप घाटमाथ्यावरून रायगड मध्ये दाखल झाला आहे. पावसाळा सुरू होईपर्यंत या कळपाचा रायगडमध्ये मुक्काम असणार आहे.



# आदिवासी मुलाला मायेचा हात



**महाड : रामप्रहर वृत्त**

महाडमध्ये एका आदिवासी कुटुंबातील दोन वर्षांच्या लहान मुलाला मायेचा हात देण्याचे कार्य भाजप नेते जयवंत दळवी यांच्या कन्या तीर्था दळवी हिने केले.

महाड शहरातील डोंगरी गल्ली येथील मध्यमा हाऊसिंग सोसायटीच्या पायरीवर एक आदिवासी पती-पत्नी काही दिवसांपासून वास्तव्यास होते. दोघेही व्यसनी व मानसिकदृष्ट्या दुर्बल असल्याचे दिसून आले. त्यांचा दोन वर्षांचा मुलगा मात्र अन्न-पाण्याविना कुपोषणाने त्रस्त होता. ही बाब जवळच राहणाऱ्या तीर्था दळवीच्या लक्षात येताच तिने क्षणाचाही विलंब न लावता त्या बालकाला आपल्या घरी नेले. त्याला आंघोळ घालून स्वच्छ कपडे परिधान केले आणि पौष्टिक अन्न देऊन त्याचे संगोपन केले. तिच्या या कार्याचे कौतुक होत आहे.

# मोर्बा येथील इफराह व इफहाम आधारकार्ड सेंटरचे स्थलांतर

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोर्बा येथे रझिया कॉम्लेक्स याठिकाणी आयसीआयसीआय बँकेजवळ इफराह व इफहाम आधारकार्ड सेंटरचे नवीन जागेत स्थलांतर करण्यात आले असून या सेंटरचा शुभारंभ शनिवार, २० ऑक्टोबर २०२५ रोजी उत्साहात करण्यात आले.



मोर्बा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा ज्येष्ठ नेते इकबालशेठ धनसे व रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे यांच्याहस्ते तसेच ग्रामस्थ व ग्राहक यांच्या उपस्थितीत फिट कापून करण्यात आले. या वेळी उपस्थित सर्व मान्यवर व ग्रामस्थ तसेच ग्राहकांचे मोर्बा ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच तथा आधारकार्ड सेंटरचे प्रोप्रायटर इकबाल हसन हरणेकर व त्यांचे कुटुंबीय तसेच मित्रपरिवार यांनी स्वागत केले.

या सेंटरचा शुभारंभ मौलाना सरफराज व मौलाना अशफाक यांनी कुराण पठणाने केले. इकबाल हरणेकर यांचे आधारकार्ड सेंटर मोर्बा गावात गेली चार वर्षांपासून सुरू असून या सेंटरमध्ये नागरिकांना उत्तम प्रकारे व जलद गतीने सेवा मिळत असल्याने हे आधार केंद्र मोर्बा विभागात नावारूपास आले आहे. या सेंटरला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व ग्रामस्थांनी उपस्थित राहून इकबाल हरणेकर व कुटुंबीय यांना आधारकार्ड सेंटर सुरू केल्यामुळे मनापासून शुभेच्छा दिल्या.

या आधारकार्ड सेंटरमध्ये आधारकार्ड काढण्याबरोबरच डोमेसाइल सर्टिफिकिट, इडब्लूएस दाखला, उत्पनाचा दाखला, पासपोर्ट, पॅनकार्ड, विवाह नोंदणी सर्टिफिकिट हि कामे करून मिळतील तसेच रेशन कार्डची ऑनलाईन कामे जलद गतीने करून मिळतील.

या सेंटरच्या शुभारंभ कार्यक्रमास राजिपचे माजी कृषी सभापती अस्लम राऊत, रायगड जिल्हा युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शादाब गैबी, सामाजिक कार्यकर्ते अल्ताफदादा धनसे, नजीर धनसे, मोर्बा सरपंच शौकत रोहेकर, रफिक हरणेकर, मुक्तार हरणेकर, सत्तर धनसे, इलियास धनसे, फरीज टाके, सलाउद्दीन बडे, शहाबुद्दीन मांडलेकर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी, ग्रामस्थ व ग्राहक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारताची उपांत्य फेरीत धडक

## महिला वर्ल्डकपमध्ये न्यूझीलंड संघावर मात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय महिला क्रिकेट संघाने महिला वनडे वर्ल्डकपमधील सेमी फायनलचे आपले स्थान पक्के केले आहे. महत्त्वपूर्ण सामन्यात भारताने न्यूझीलंडचा डीएलएस नियमानुसार ५३ धावांनी पराभव केला. या सामन्यात पावसाचा व्यत्यय आला होता. त्यामुळे न्यूझीलंडला ४४ षटकात ३२५ धावांचे आव्हान मिळाले होते, मात्र न्यूझीलंडला आठ बॅटर्सच्या मोबदल्यात २७१ धावाच करता आल्या.

महिला वनडे वर्ल्डकपमध्ये ऑस्ट्रेलिया, दक्षिण अफ्रिका आणि इंग्लंड हे संघ आधीच सेमी फायनलमध्ये पोहचले आहेत. दुसरीकडे न्यूझीलंड, श्रीलंका, बांगलादेश आणि पाकिस्तान या संघांना सेमी फायनलमध्ये प्रवेश करणे जमले नाही.

भारतीय संघाने वर्ल्डकपची धडाकेबाज सुरुवात केली होती. त्यांनी श्रीलंका आणि पाकिस्तानवर विजय मिळवला होता, मात्र दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडविरुद्धच्या सलग तीन सामन्यात संघाला पराभवाचे तोंड पहावे लागले.




त्यामुळे टीम इंडियाच्या सेमी फायनल प्रवेशाच्या स्वप्नांना धक्का बसला होता.

न्यूझीलंडविरुद्धचा सामना हा करो या मरो स्थितीतला होता. या सामन्यात हरमनप्रीतच्या नेतृत्वाखील खेळणाऱ्या टीम इंडियाने चांगली कामगिरी केली. आता भारताचा लीग स्टेजमधला शेवटचा सामना हा बांगलादेशसोबत २६ ऑक्टोबरला होणार आहे.

दरम्यान, भारताचा सेमी फायनलमध्ये कोणाशी सामना होणार हे अजून निश्चित झालेले नाही. भारत सध्या गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे. जर भारताने बांगलादेशविरूद्धचा सामना जिंकला, तर भारताला गुणतालिकेत पहिल्या स्थानावर असलेल्या संघासोबत सेमी फायनल खेळायची आहे.

दुसरीकडे ११ गुण असलेली ऑस्ट्रेलिया आणि १० गुण असलेली दक्षिण अफ्रिका यांच्यात होणाऱ्या सामन्यावर भारत सेमी फायनलमध्ये कोणासोबत खेळणार हे ठरणार आहे. ऑस्ट्रेलिया गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातील सामना हा २५ ऑक्टोबरला होणार आहे. या दोघांमधील कोणता संघ प्रथम स्थानावर येईल तो सेमी फायनलमध्ये भारतासोबत खेळेल.

# आशियाई युवा क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील तायक्कांदोपटूंची निवड



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सहा प्रतिभावान खेळाडूंची तिसऱ्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा २३ ते २६ ऑक्टोबरदरम्यान बहरीन येथे होत आहे.

निवड झालेल्या खेळाडूंमध्ये प्रिशा शेट्टी, धनश्री पवार, किसारा थानोजी साई रेड्डी, अक्षरा शानबाग, आर्यन जोशी आणि समर्थ गायकवाड यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे किसारा थानोजी ही स्पर्धात्मक लढत आणि प्रात्यक्षिक अशा दोन्ही प्रकारांमध्ये लढणार आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून हे युवा खेळाडू उत्तर प्रदेशातील लखनऊ येथील भारतीय क्रीडा प्राधिकरण प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत आहेत. या गौरवात आणखी भर घालताना महाराष्ट्रातील दोन प्रशिक्षक प्रणव निवांगुणे (पुणे) आणि राजन सिंग (मुंबई उपनगर) यांचीही आशियाई युवा क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.

इंडिया तायक्कांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर, तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप ओंबासे, सरचिटणीस अमजदखान (गफार) पठाण आणि खजिनदार डॉ. प्रसाद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्यासाठी एक भक्कम पाया तयार झाला; तर कार्यकारिणी सदस्य तुषार आवटे, सुरेश चौधरी, घनश्याम सानप, प्रमोद दौंडे, पद्माकर कांबळे आणि नारायण वाघाडे यांचा सातत्यपूर्ण पाठिंबा लाभला आहे.

# वर्ल्ड मास्टर्स पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये महाराष्ट्राचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक (वर्ल्ड) मास्टर्स क्लासिक व इक्यूपड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धा (पुरुष व महिला) २०२५ नुकतीच दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन येथे झाली. या स्पर्धेत भारतीय संघात निवड झालेल्या महाराष्ट्राच्या मास्टर्स खेळाडूंनी इक्विपमध्ये दमदार कामगिरी करत तीन सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कांस्य अशी पदके जिंकली, तर क्लासिकमध्ये तीन कांस्यपदके प्राप्त केली.



खेळाडूंच्या या कामगिरीबाबत महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष अर्जुन पुरस्कार सन्मानित एदोदि भास्करन, सरचिटणीस शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित, आंतरराष्ट्रीय पंच संजय सरदेसाई यांनी आनंद व्यक्त केला आहे. सर्व स्पर्धकांचे मुंबई विमानतळावर स्वागत करण्यात आले.

**पदक प्राप्त खेळाडू**

इक्विपड : संगीता मारुती ढोले, डॉ. शर्वरी इनामदार, दत्तात्रय उतेकर सुवर्णपदक; अर्चना काळे, किरण त्यागी रौप्यपदक; विशाल उंबाळकर कांस्यपदक.

क्लासिक : डॉ. शर्वरी इनामदार, रंजीता मिश्रा, दत्तात्रेय उतेकर कांस्यपदक.

# ‘डब्ल्यूपीएल’चा लिलाव २६ किंवा २७ नोव्हेंबरला होण्याची शक्यता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला प्रीमियर लीग २०२६च्या लिलावासंदर्भात मोठी अपडेट समोर आली आहे. वृत्तानुसार पुढील महिन्यात म्हणजे नोव्हेंबरच्या २६ किंवा २७ तारखेला डब्ल्यूपीएल लिलावाचे आयोजन होण्याची शक्यता आहे. यापूर्वी हा लिलाव २६ ते २९ नोव्हेंबरदरम्यान होणार होता, पण त्यानंतर बीसीसीआयने त्याच्या तारखेत बदल केला आहे.

‘क्रिकबझ’च्या एका वृत्तानुसार या लिलावासाठी अद्याप कोणतीही तारीख निश्चित झालेली नाही. तथापि, हा लिलाव एकाच दिवसात दिल्लीतील एका हॉटेलमध्ये पूर्ण होईल, असे मानले जात आहे. त्यामुळे २६ किंवा २७




नोव्हेंबर यापैकी कोणत्याही एका दिवशी डब्ल्यूपीएल २०२६चा लिलाव होऊ शकतो. डब्ल्यूपीएलमध्ये एकूण पाच संघ खेळतात आणि त्यामुळे त्यांच्या लिलावाला जास्त वेळ लागणार नाही. परिणामी एकाच दिवसात सर्व संघांचे खेळाडू निश्चित केले जातील.

सुमारे ९० खेळाडूंवर बोली लागण्याची शक्यता आहे, तरीही बहुतांश संघांमधील अनेक खेळाडूंना रिटेन केले जाण्याची शक्यता आहे. सर्व पाच फ्रेंचायझींना ५ नोव्हेंबरपर्यंत त्यांच्या रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

डब्ल्यूपीएलने खेळाडूंना रिटेन ठेवण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वेही जारी केली आहेत. यानुसार टॉपच्या खेळाडूला ३.५ कोटी रुपये मिळतील. त्याचप्रमाणे दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावरील रिटेन खेळाडूंना अनुक्रमे २.५ कोटी, १.७५ कोटी, एक कोटी आणि ५० लाख रुपये इतकी रक्कम मिळेल.

जर एखाद्या संघाने जास्तीत जास्त पाच खेळाडूंना कायम ठेवले, तर त्यांच्या पर्समध्ये ५.७५ कोटी रुपये शिल्लक राहतील, जी रक्कम फ्रँचायझी लिलावात खर्च करू शकेल. डब्ल्यूपीएलने प्रथमच फ्रँचायझींना लिलावात ‘राइट-टू-मॅच’चा पर्याय वापरण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. या पर्यायाद्वारे संघ २०२५मध्ये त्यांच्या संघाचा भाग असलेल्या कोणत्याही खेळाडूला लिलावाद्वारे परत खरेदी करू शकतात. यासोबतच डब्ल्यूपीएलने पुढील हंगामापूर्वी होणाऱ्या लिलावासाठी १५ कोटी रुपयांची लिलाव पर्स (ऑक्शन पर्स) ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

# रोहित शर्मा ‘सिक्सर किंग’ होण्याच्या मार्गावर

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू असलेल्या एकदिवसीय मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारताचा माजी कर्णधार रोहित शर्माने ७३ धावांची खेळी केली. या खेळीमुळे त्याने आपला फॉर्म परत मिळवल्याचे संकेत दिले. याचसोबत रोहित शर्मा आता क्रिकेट जगतातील एका विश्वविक्रमाच्या अगदी उंबरठ्यावर उभा आहे.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विश्वविक्रम सध्या शाहिद आफ्रिदीच्या नावावर आहे. आफ्रिदीने आपल्या ३९८ सामन्यांच्या कारकिर्दीत ३५१ षटकार मारले आहेत. तो जगातील एकमेव फलंदाज आहे, ज्याने ३५०पेक्षा जास्त षटकार मारले आहेत. आफ्रिदी २०१५मध्ये निवृत्त झाल्यापासून हा विक्रम अबाधित



आहे. रोहित शर्माने आतापर्यंत २७५ एकदिवसीय सामन्यांत ३४६ षटकार मारले आहेत आणि तो सध्या या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. आफ्रिदीचा विक्रम मोडण्यासाठी रोहितला फक्त सहा षटकारांची गरज आहे.

रोहितने आणखी चार षटकार मारल्यास, तो ३५० षटकार पूर्ण करणारा जगातील दुसरा फलंदाज ठरेल. पाच षटकार मारल्यास तो आफ्रिदीच्या ३५१ षटकारांच्या विक्रमाची बरोबरी करेल आणि सहावा षटकार मारताच तो आफ्रिदीला मागे टाकून एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणारा जगातला नंबर वन फलंदाज बनेल.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात रोहितने ९७ चेंडूत ७३ धावांची खेळी करताना दोन उत्तुंग षटकार मारले. पहिल्या सामन्यात तो अपयशी ठरला होता. आता मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना बाकी आहे. क्रिकेट चाहत्यांना अपेक्षा आहे की, रोहित शर्मा तिसऱ्या वनडेमध्ये मोठी आणि स्फोटक खेळी करेल आणि सोबतच आफ्रिदीचा सुमारे १० वर्षांपूर्वीचा हा मोठा विश्वविक्रम मोडून नवा इतिहास रचेल.

# दक्षिण आफ्रिकेकडून पाकिस्तानचा धुव्वा

## दुसऱ्या कसोटीतील विजयासह मालिकेत साधली बरोबरी

**रावळपिंडी** : ऑफ-स्पिनर सायमन हार्मरच्या (६/५०) प्रभावी फिरकी गोलंदाजीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या आणि अखेरच्या कसोटी क्रिकेट सामन्यात गुरुवारी पाकिस्तानवर आठ गडी राखून विजय मिळवला. यासह आफ्रिकेने दोन सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत सोडवली.

पाकिस्तानने लाहोर येथे झालेला पहिला कसोटी सामना ९३ धावांनी जिंकला होता. त्यानंतर रावळपिंडी येथील दुसऱ्या कसोटीतही पाकिस्तानला पहिल्या डावात वर्चस्व प्रस्थापित करण्याची संधी होती, मात्र तळाच्या फलंदाजांमुळे दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात आघाडी मिळवली. त्यानंतर हार्मरच्या गोलंदाजीसमोर पाकिस्तानचा दुसरा डाव १३८ धावांत आटोपला. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी ६८ धावांचे माफक लक्ष्य मिळाले, जे त्यांनी १२.३ षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात गाठले.

# माणगावमधील गांगवली येथे क्रिकेटपटूंचा गौरव

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील गांगवली येथे आयोजित उत्साही क्रिकेट सामन्याला आई कनकाई सामाजिक संस्थेचे संस्थापक सुशील कदम यांनी उपस्थित राहून तरुण खेळाडूंना प्रोत्साहन दिले. संस्थेच्या वतीने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा गौरव करून त्यांना प्रोत्साहनपर भेटवस्तू देण्यात आल्या.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुणांमध्ये क्रीडाविषयी आवड आणि उर्जा निर्माण व्हावी हा उद्देश संस्थेचा होता.



कार्यक्रमादरम्यान स्थानिक क्रीडाप्रेमी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गौरव सोहळ्यानंतर खेळाडूंनी आई कनकाई सामाजिक संस्थेचे आभार मानले.

# तिलक वर्माने केला जीवघेण्या आजाराचा खुलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय टी-२० संघाचा युवा स्टार बॅटर तिलक वर्मा ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतून पुन्हा एकदा मैदानात उतणार आहे. आशिया कप स्पर्धेत टीम इंडियाला जेतेपद मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या या क्रिकेटने जीवघेण्याचा आजाराचा सामना केला आहे. एका मुलाखतीमध्ये त्याने गंभीर आणि जीवघेण्याचा आजाराचा सामना केल्याचा खुलासा केला आहे.

तिलक वर्मा २०२२च्या आयपीएल स्पर्धेनंतर रबडोमायोलिसिस आजाराने बेजार झाला होता. या संदर्भात गौरव कपूरच्या ‘ब्रेकफास्ट विथ चॅम्पियन्स’ या खास शोमध्ये त्याने सांगितले की, बांगलादेश ‘अ’ विरुद्धच्या सामन्यात अचानक माझी तब्येत बिघडली. शंभर चेंडूचा सामना केल्यावर अचानक माझ्या डोळ्यातून पाणी येऊ लागले. माझ्या बोटांची हालचाल होणे बंद झाले. शरीर दगडासारखे कठीण झाले होते. त्यामुळे रिटायर्ड हर्ट होत मैदान सोडण्याची वेळ माझ्यावर आली. हाताची बोटांची अजिबात हालचाल होत नसल्यामुळे त्यावेळी ग्लोव्हज कापून काढावे लागले. एवढेच नाही तर उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यावर सलाईन लावताना सुई मोडली होती.

तेव्हा मी मुंबई इंडियन्स संघाचा भाग होतो.



मला आकाश अंबानी यांचा कॉल आला. त्यांनी बीसीसीआयशी संपर्क साधला. त्यांच्यासह जय शाह यांची मदत मिळाली. मला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. उशीर झाला असता तर जीवाला धोका होता, असे तिलक वर्माने म्हटले.

### काय आहे रबडोमायोलिसिस?

रबडोमायोलिसिस ही एक जीवघेणी आजार आहे, ज्यात शरीरातील स्नायूंची ऊती (मसल्स) तुटू लागतात आणि त्यातील मायोग्लोबिन नावाचे प्रोटीन रक्तात मिसळते. त्यामुळे मूत्रपिंडांवर (किडनीवर) गंभीर परिणाम होऊ शकतो. विश्रांती न घेता सातत्याने सराव आणि जीम सत्र यावर फोकस केल्यामुळे या गंभीर आजाराचा सामना करण्याची वेळ आली होती, असेही क्रिकेटरने म्हटले आहे.

# झिम्बाब्वेचा घरच्या मैदानावर ऐतिहासिक विजय

**झिम्बाब्वे : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तान आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये एकमात्र कसोटी सामना पार पडला. या सामन्यात झिम्बाब्वेने अफगाणिस्तानवर एक डाव आणि ७३ धावांनी दमदार विजय मिळवला आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तानचा डाव अवघ्या १२७ धावांवर आटोपला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या झिम्बाब्वेने ३५९ धावांचा डोंगर उभारला आणि २३२ धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात फलंदाजीला आलेल्या अफगाणिस्तानचा डाव अवघ्या १५९ धावांवर आटोपला. यासह झिम्बाब्वेने १२ वर्षांनंतर घरच्या मैदानावर खेळताना विजय मिळवला आहे.




टी-२० आणि वनडे क्रिकेटमध्ये भागीदारीला फार महत्त्व नसते. कारण वेगाने धावा करायच्या असतात. पण कसोटी क्रिकेटमध्ये भागीदारी करणे खूप महत्त्वाचे असते. अफगाणिस्तानचे फलंदाज भागीदारी करण्यात अपयशी ठरले. अफगाणिस्तानकडून पाचव्या विकेटसाठी केलेली ४९ धावांची भागीदारी ही सर्वोत्तम भागीदारी ठरली. झिम्बाब्वेकडून गोलंदाजी करताना २७ वर्षीय वेगवान गोलंदाज रिचर्ड नगारवाने १३ षटकात ३७ धावा खर्च करून पाच गडी बाद केले. तर ब्लेसिंग मुजरबानीने तीन, तनाका चिवांगाने दोन गडी बाद केले. या दमदार गोलंदाजीच्या बळावर अफगाणिस्तानचा पहिला डाव अवघ्या १२७ धावांवर आटोपला.

या सामन्यात पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या झिम्बाब्वेने ३५९ धावांचा डोंगर उभारून २३२ धावांची भक्कम आघाडी घेतली. झिम्बाब्वेकडून या डावात फलंदाजी करताना सलामीवीर फलंदाज बेन करनने १२१ धावांची दमदार खेळी केली, तर सिकंदर रझाने ६५ धावा केल्या. तर निक वलेचने ४९ आणि ब्रेड ईवांसने ३५ धावांची खेळी केली. यादरम्यान अफगाणिस्ताकडून गोलंदाजी करताना जियाऊर रहमानने सात गडी बाद केले.

अफगाणिस्तानकडून दुसऱ्या डावात फलंदाजी करताना इब्राहिम जादरानने ४२ धावांची खेळी केली, तर बहिर शाहने ३२ धावांची खेळी केली. याआधी अफगाणिस्तान आणि बांगलादेश या दोन्ही संघांमध्ये तीन वनडे आणि तीन टी-२० सामन्यांची मालिका पार पडली. या मालिकेतील तिन्ही सामन्यांमध्ये अफगाणिस्तानला पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे झिम्बाब्वेविरूद्ध अफगाणिस्तानकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती, पण असे होऊ शकले नाही.

**१२ वर्षांनंतर मायदेशी यश**

झिम्बाब्वेसाठी हा मालिका विजय खूप मोठा आहे, कारण झिम्बाब्वेला गेल्या १२ वर्षांत एकही कसोटी सामना जिंकता आला नव्हता. १२ वर्षांनंतर झिम्बाब्वेने मायदेशात खेळताना पहिलाच सामना जिंकला आहे, तर २४ वर्षांनंतर झिम्बाब्वेने पहिल्यांदाच एका डावाने विजय मिळवला आहे. २००१नंतर पहिल्यांदाच असे घडले आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com